# शेतमजूर व रोजगार हमी कामगार समन्वय समिती

## ★ कोपरगांव परिषदेचा अहवाल ★



१२ डिसेंबर १९८४ रोजी कोपरगाव येथे परिषदेस आलेले प्रतिनिधी

१९८४–८५

प्रकाशक :

**प्रकाश शिंदे**

५४, बुधवार पेठ

काकाकुवा मॅन्शन,

पुणे ४११ ००२.

●

मुद्रक :

**सुशांत एन्टरप्राईझेस**

कमर्शियल प्रिंटर्स अॅण्ड सप्लायर्स,

५७९, शनवार पेठ, पुणे २.

●

मूल्य : २ रुपये

# प्रास्ताविक

शेतमजूर व रोजगार हमी कामगार समन्वय समितीच्या वतीने १२ डिसेंबर ८४ रोजी झालेल्या १ ल्या व ग्रामीण श्रमिकांच्या चळवळीमधील ऐतिहासीक अशा परिषदेचा वृत्तात, ठराव पुस्तिके- द्वारे महाराष्ट्रातील शेतमजूर व रोजगार हमी कामगार, ग्रामीण श्रमिक व कार्यकर्त्यांच्या हाती देताना आनंद होत आहे.

समन्वय समितीच्या स्थापनेपूर्वी विविध संघटना आपापल्या परीने ग्रामीण श्रमिकांच्या प्रश्नांवर हालचाली करीत होत्या, परंतु महाराष्ट्राच्या सुमारे ३५७७८ खेड्यांमधून विखुरलेल्या ६५ लाख शेतमजुरांना संघटीत करणे हे अवघड व गुंतागुतीचे काम आहे परंतु सर्व संघटनांनी एकजुटीने, जिद्दीने हा प्रश्न धसास लावण्याचा निर्धारच केलेला आहे.

समन्वय समितीच्या वतीने १९८२, ८३, व ८४ या वर्षात केलेल्या आंदोलनाचा आढावा घेतला तर हे सहज लक्षात येते की शेतमजूर आता पूर्वीपेक्षा अधिक धीटपणे रस्त्यावर येऊन आपल्या- वरील अन्यायाविरूद्ध संघटित आवाज उठवू लागला आहे.

२३ एप्रिल ८२ रोजी प्रथमच एकजूटीने अभूतपूर्व असा महाराष्ट्रव्यापी संप झाला ज्यात सुमारे ७१ हजार ग्रामीण श्रमिकांनी भाग घेतला. १३ सप्टेंबर ते १७ सप्टेंबर ८२ रोजी हुतात्मा चौकात झालेल्या धरणे धरण्याच्या कार्यक्रमास तर अभूतपूर्व असा प्रतिसाद मिळाला. २१ जिल्ह्यातून सुमारे १५०० प्रतिनिधींनी भाग घेतला. २२ ऑक्टोबर ८२ रोजी महाराष्ट्रभर झालेल्या आंदोलनाने तर सर्वसामान्य लोकांचेमध्ये कुतूहल निर्माण झाले. ५ लाख शेतमजूर व रोजगार हमी कामगार संपावर गेले तर सुमारे १ लाखाचे वर

मजुरांनी निदर्शनात भाग घेतला. १६ ते २२ डिसेंबर ८२ मागणी सप्ताह एकजुटीने पाळला गेला. शासनाला तुटपुंजे का होईना परंतु किमान वेतन २६ जाने. ८३ रोजी परिणामी जाहीर करावे लागले

२१ ते २७ नोव्हेंबर ८३ या सप्ताहात महाराष्ट्रभर एकूण १३८ सभा, १०९ बैठका, पदयात्रा, २४ ठिकाणी निवेदने, १० धरणे, २४ मोर्चे व ७ निदर्शने अशा कार्यक्रमात भाग घेऊन लाखो मजुरांनी मागण्यांच्या पूर्ततेसाठी लढण्याचा निर्धार बळकट केला. २६ मार्च ८४ ते २८ मार्च ८४ या काळात आपल्या मागण्यांचे पूर्ततेसाठी सुमारे ३ हजार शेतमजुरांनी मुंबई येथे हुतात्मा चौकात धरणे धरले. मुंबईच्या कामगारांनीही या श्रमिकांना पाठिंबा व मदत केली. रोजगार हमी वरील ५०० मस्टर असिस्टंटनीही मजुरांच्या हातात हात घालून या लढ्यात साथ केली.

या लढ्याच्या प्रमुख घटनाक्रमांवरून हे लक्षात येईल की, आपल्या न्याय मागण्यांसाठी ही महाराष्ट्रव्यापी चळवळ म्हणजे ग्रामीण श्रमिकांच्या वाढत्या हाल अपेष्टांबाबत शासनाच्या उदासिनतेचा व आडमुठे धोरणा विरूद्धचा कडक निषेधच होय. ही चळवळ अधिक नेटाने व जोमाने पुढे चालविण्याची गरज आहे. संघटीत शक्तीच्या जोरावर, चळवळीच्या व लढ्याच्या आधारे ग्रामीण श्रमिकांची परिस्थिती सुधारण्याचाच समन्वय समितीचा प्रयत्न व निर्धार आहे. हाच प्रयत्न व निर्धार शेवटपर्यंत कायम ठेवून सर्व संघटनांच्या कार्यकर्त्यांनी बारकाईने, जाणीवपूर्वक प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याची गरज आहे. त्या कामी ही पुस्तिका अल्पअंशाने का होईना परंतु उपयुक्त होईल. अशी आशा आहे.

**प्रकाश शिंदे**

प्रकाशक

# शेतमजूर, रोजगार हमी कामगार समन्वय समिती

# ★ कोपरगांव परिषदेचा अहवाल ★

शेतमजूर व रोजगार हमी कामगार समन्वय समितीची पहिली राज्यव्यापी परिषद कोपरगाव येथे दि. १२ डिसेंबर १९८४ रोजी कोपरगावच्या विशाल शेतकी प्रदर्शन मैदानात मोठ्या उत्साहाने पार पडली. या परिषदेसाठी गडचिरोली पासून ते कोल्हापूरपर्यंत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून सुमारे २० हजार प्रतिनिधी उपस्थित होते. प्रतिनिधींनी सभामंडप भरून गेला होता व जागेअभावी अनेक प्रतिनिधी मंडपाबाहेर उभे होते. प्रतिनिधीपैकी निम्मी संख्या स्त्रियांची होती. स्त्री प्रतिनिधी देखील दूरदूरचे जिल्ह्यातून मोठ्या उत्साहाने आले होते. सभामंडप समन्वय समितीच्या जयजयकाराचे घोषणांनी दुमदुमून गेला होता. ते दृश्य म्हणजे महाराष्ट्रातील ग्रामीण कष्टकरी जागा होऊन आपल्या मागण्यांसाठी लढयास सिद्ध झाल्याचा एक पुरावाच होता

सुरवातीला अहमदनगर जिल्हा शेतमजूर युनियनचे कॉ भि. र. बावके यांनी आलेल्या प्रतिनिधींचे स्वागत केले. नंतर परिषदेचे कामकाज चालविण्यासाठी खालील अध्यक्ष मंडळाची निवड करण्यात आली १) कॉ स ना भालेराव २) कॉ भास्करराव जाधव ३) साथी एम्. के. खमसे ४) साथी मोहन हिरबाई हिरालाल ५) साथी सुभाष लोमटे ६) साथी विवेक पंडीत ७) श्री जयराम भोयर ८) साथी शांताराम पंदेरे ९) श्री. भिमराव म्हस्के १०) श्री. सिताराम बाजारे.

अध्यक्ष मंडळाने परिषदेची सूत्रे हाती घेतल्यानंतर श्रीमती इंदिरा गांधी, श्री. यशवंतराव चव्हाण, श्री. अशोक मेहता, कॉ. एम. एन. गोविंदन नायर या राष्ट्रीय नेत्यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

त्याचप्रमाणे आपल्या चळवळीतील रोजगार हमीवर झालेल्या भूक–बळी गडचिरोली जिल्ह्यातील श्री. पुंडलीक विस्तारी वधारे व नांदेड जिल्ह्यातील निवृत्ती भिसे या मजुरांचे निधनाबद्दल शोक व्यक्त करण्यात आला. तसेच सावलदे, ता. शिरपूर. जि. धुळे येथील शेतमजूर श्री. पांडू कौतिक भिल याचा धनदांडग्यानी केलेल्या मारहाणीत झालेला मृत्यू व शहादे तालुक्यातील शेलटी - सजदे या गावातील ५ आदिवासी शेतमजुरांची झालेली हत्या या बद्दलही परिषदेमध्ये शोक प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

त्यानंतर समितीचे निमंत्रक साथी वा. न. राजहंस यांनी परिषदेचे उद्घाटन केले. उद्घाटनानंतर परिषदेत कॉ. दत्ता देशमुख यांनी किमान वेतन विषयक ठराव मांडला व त्याला साथी एम. के. खुमरे यांनी अनुमोदन दिले. दुसरा रोजगार हमी विषयक ठराव साथी मोहन हिराबाई हिरालाल यांनी मांडला व त्यावर कॉ. रूक्मीणीबाई माने आणि श्री. सिताराम बाजारे यांनी अनुमोदन दिले. शेतमजुरांसाठी सर्वंकष कायदा करावा या मागणीचा प्रस्ताव कॉ. एम्. बी. मोरे यांनी मांडला व त्याला श्री. प्रदीप प्रभू यांनी अनुमोदन दिले. चौथा अतिक्रमित व हस्तांतरीत जमिनीचा ठराव साथी सुभाष लोमटे यांनी मांडला व त्याचेवर साथी भिमराव म्हस्के आणि साथी भास्करराव पाटील यांची अनुमोदनपर भाषणे झाली. त्यानंतर वेठबिगारांच्या संबंधीचा ठराव साथी विवेक पंडीत यांनी मांडला व त्याला साथी सदिपान बडगीरे यांनी अनुमोदन दिले. शेतमजूर व भूमिहिनांना घरासाठी जागा व मदत मिळावी. या संबंधीच्या ठरावाची सूचना साथी शांताराम पंदेरे यांनी केली व

त्याला भाई रजनिकांत यांनी अनुमोदन दिले. हे सर्व ठराव आलेल्या प्रतिनिधींनी एकमताने टाळ्यांच्या गजरात, हात वर करुन प्रचंड उत्साहाने मंजूर केले. शेवटी या सर्व ठरावातील मागण्या पदरात पाडून घेण्यासाठी संघर्ष करण्यासंबंधीचा ठराव कॉ. सी. डी चौधरी यांनी मांडला व त्याला कॉ. गणपत लोके व साथी सत्यवान कुंभारकर यानी अनुमादन दिले. या ठरावान्वये ता. ५ फेब्रुवारी १९८५ रोजी वरील मागण्यासंबंधीचा आवाज उठविण्यासाठी महाराष्ट्रभर गावपातळीपासून तालुका व जिल्हा पातळीपर्यंत मोर्चे, निदर्शने व सप इत्यादि कार्यक्रम करण्याचा निर्णय घेण्यात आला व ५ फेब्रुवारीचे निदर्शनाचा आढावा घेऊन या मागण्यांचे पुर्ततेसाठी तपशीलवार संघर्षाचा कार्यक्रम आखावा असा आदेश समन्वय समितीला देण्यात आला.

शेवटी समन्वय समितीचे दुसरे निमंत्रक कॉ. संतराम पाटील यांनी परिषदेचा समारोप केला. आगामी संघर्षासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात शेतमजूर, रोजगार हमी कामगार, सालदार, वेठ-बिगार यांना उभे करण्याचे आवाहन त्यांनी सर्व प्रतिनिधींना केले. महाराष्ट्रात आपली संख्या एक कोटीचेवर असताना आपण असंघटित व दुर्बल असल्याने आपल्या मागण्या पडून रहातात असे सांगून या मागण्यांच्या पूर्ततेसाठी किमान एक लाख लोक तुरुंगात घालण्याची तयारी करण्याचे त्यांनी आवाहन केले.

समारोपानंतर साथी मुकुंद कोलटकर यांनी स्वागत समितीचे व स्थानिक कार्यकर्त्यांचे, प्रतिनिधींची चोख व्यवस्था केल्याबद्दल समन्वय समितीचे वतीने आभार मानले. शेवटी स्वागत समितीचे वतीने कॉ. पुष्पलता आराळकर यांनी परिषद यशस्वी करण्यासाठी ज्यांनी ज्यांनी मदत व सहकार्य केले त्यांचे आभार मानल्यावर परि-षदेचे कामकाज समाप्त झाले.

# १२ डिसेंबर १९८४ रोजी कोपरगांव येथे पार पडलेल्या परिषदेत मंजूर झालेले ठराव.

## ठराव १ : किमान वेतन--

सध्याचे शेतमजूर, सालदार, महिनेदार, यांत्रिकी कामगारांचे किमान वेतन शेतमजूर आदींच्या कुटुंबातील माणसांची संख्या, ते करीत असलेल्या कामाचे स्वरूप, त्यांची आहाराची गरज व त्यांच्या इतर किमान गरजा इत्यादीसंबंधी विचार न करताच ठरविण्यांत आले आहे. अशा या तुटपुंज्या किमान वेतनाची देखील अंमलबजावणी करीत असताना शेतमजुरांना परंपरेने मिळणाऱ्या चारा-सरपण नेण्या-सारख्या हक्कांचे व प्रथांचे उल्लंघन होते, सरकारने ठरविलेल्या किमान वेतनाला महागाई भत्ता अगर खास भत्ता याची जोड देण्यात आलेली नाही. तिसऱ्या पागे समितीने अहवाल जानेवारी १९८२ मध्ये सादर केला. तेंव्हा महागाई निर्देशांक २०७८ वर होता. सरकारने शिफारशीवरील निर्णय फेब्रुवारी १९८३ मध्ये लागू केला तेंव्हा निर्देशांक २३०४ वर गेला व जुलै १९८४ मध्ये तो २५९३ वर पोचला. वाढीचा दर सरासरी वेग लक्षात घेता आजपर्यंत पुन्हा किमान १०० आकड्यांनी वाढलाच आहे. या महागाई वाढीचा जास्तीतजास्त तडाखा शेतमजूर, रोजगार हमी कामगार आदि कष्टकरी गरीबांनाच बसला आहे व बसतो आहे.

शेतमजूरांना वर्षातून कांही दिवसच काम मिळते. ही वस्तु-स्थिती सर्वमान्य आहे. यात भरीस भर म्हणून शेती व्यवसायात शेत जमिनीच्या मालकीचे केंद्रीकरण मूठभर लोकांच्या हातात वाढत आहे. त्यामुळे व तसेच शेतीमधील वाढत्या यंत्र सामुग्रीचा वापर दिवसेंदिवस वाढत आहे या गोष्टीचा परिणाम म्हणून शेतमजूरांच्या

संख्येत फार मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे व त्यांचे मजुरीचे कामाचे दिवस आणखी कमी होत आहेत हे लक्षात घेता शेतमजुरांचे किमान वेतन योग्य पायावर निर्धारित होण्याला आणि विशेषत: त्याचा वाढत्या महागाईशी संबंध जोडण्याच्या प्रश्नाला अधिकच महत्त्व प्राप्त झाले आहे.

पागे समितीने १५ वर्षाच्या मुलामुलींना प्रौढा इतके वेतन द्यावे, सालदारांना जनता विमा योजना लागू करावी अशा शिफारशींबरोबरच प्रत्येक वर्षाच्या १ मे ला मधल्या काळातील निर्देशांकातील वाढ लक्षात घेऊन वेतनात वाढ करावी अशी शिफारस केली होती. महाराष्ट्र सरकारने या शिफारशी मान्य केल्या नाहीत. या मधल्या काळांत केंद्र सरकारने आपल्या अखत्यारीतील शेतमजुरांच्या किमान वेतनात दोन वेळा वाढ केली या गोष्टी लक्षात घेता सध्या चालू असलेल्या किमान वेतनाची ताबडतोब फेररचना झालीच पाहिजे. सध्याच्या ४ झोनऐवजी ३ झोन केले पाहिजेत व तेथे अनुक्रमे १२ रु., १५ रु., १८ रु. रोज असे किमान वेतन ठरविले गेले पाहिजे. निर्देशांकांतील बदलानुसार या किमान वेतनात वेळोवेळी वाढ करण्याची तरतूद केली पाहिजे अशी या परिषदेची आग्रही मागणी आहे.

मजूर मंत्र्यांची बैठक दिल्लीत झाली असता प्रत्येक दोन वर्षांनी किमान वेतनाचा फेरविचार करावा असा ठराव करण्यात आला होता. केंद्र सरकारने केंद्रशासीत प्रदेशातील मजूरांच्या किमान वेतनात वेळोवेळी बदल केला आहे. कांही राज्यांनीही असे बदल केले आहेत. परंतु महाराष्ट्र सरकारने या बाबतीत कांहीही केलेले नाही. शेतमजूरांतील जागृती, सध्याच्या अत्यंत जिकीरीच्या आपल्या जीवनात सुधारणा झाली पाहिजे ही त्यांची तीव्र इच्छा व त्याला धरून ते करीत असलेल्या निरनिराळ्या स्वरूपातील हालचाली आणि महागाईत झालेली प्रचंड वाढ यांची नोंद घेऊन या

वास्तवाची दखल घेणे महाराष्ट्र सरकारलाही क्रमप्राप्त ठरल्याने आता सरकारने शेतमजुरांच्या मजुरीतील वाढीचा प्रश्न आपल्या विचाराधीन असल्याचे शेतमजूर व रोजगार हमी कामगार समन्वय समितीला कळविले आहे. त्यालाही कांही महिने झाले आहेत. मुळात ठरलेले तुटपुंजे वेतन व भरमसाठ वाढलेली व वाढत असलेली महागाई लक्षात घेता या बाबतीतील निर्णय तावडतोब झाला पाहिजे.

या ठरावात केलेल्या सर्व उहापोहाचा विचार करता शासनाने शेतमजूरांचे किमान वेतन वर सुचविल्याप्रमाणे तावडतोबीने पुनः निर्धारित करावे व त्याला महागाई निर्देशांकाची जोड देऊन वाढत्या महागाईप्रमाणे त्यात वेळोवेळी वाढ होईल अशी तरतूद करावी अशी या परिषदेची निकडीची मागणी आहे. किमान वेतनाचे कायदे होऊनही त्याची शासनाकडून व संबंधितांकडून अंमलबजावणी होत नाही. एवढेच नव्हे तर सरकारी यंत्रणा ही संबंधितांना या कायद्याच्या अंमलबजावणीतून सुटण्यासाठी पळवाटा दाखवणारी यंत्रणाच ठरते असा अंमलबजावणी बाबतीतील शेतमजूरांचा व शेत-मजूर संघटनांचा सार्वत्रिक अनुभव आहे म्हणून किमान वेतन कायद्याची व कायद्यातील तरतुदींची अंमलबजावणी करणे ही माल-कांची जबाबदारी ठरवून त्यांची अंमलबजावणी न केल्यास तो दखलपात्र गुन्हा ठरेल अशी किमान वेतन कायद्यात तरतूद झाली पाहिजे अशी अंमलबजावणी प्रत्यक्षात येऊ शकेल या दृष्टीने या बाबतीत शेतमजुरांना व शेतमजूर संघटनांना अधिकार मिळाले पाहिजेत. किमान वेतन पुनः निर्धारित होणे, वाढत्या महागाईशी त्याचा संबंध जोडला जाणे व कायद्याची व त्यातील तरतुदीची काटेकोर अंमलबजावणी होणे या गोष्टी अखेरीस आपल्या संघटनेवर, जुटीवर व लढा सामर्थ्यावर सर्वस्वी अवलंबून आहेत हे लक्षात घेता त्या रीतीने शेतमजूर, रोजगार हमी कामगार, सालदार, महिनेदार

व अंगावर कामे घेणारे मजूर यांनी स्वतःची सर्वतऱ्हेने सिद्धता करावी असे आवाहन ही परिषद त्यांना करीत आहे.

## ठराव २ : रोजगार हमी

रोजगार हमी योजना सुरू झाली तरी कामाची गरज असणाऱ्या सर्वांना काम मिळतेच असे नाही. मागेल त्याला हक्क म्हणून पंधरा दिवसांचे आत काम पुरविलेच पाहिजे हा रोजगार हमी योजनेचा गाभा आहे. काम पुरविले गेले नाही तर बेरोजगार भत्ता देण्याची कायद्यात तरतूद आहे. पण काम मागणीचे अर्ज न स्विकारणे, पाच किलो मीटरच्या आत काम न देणे, दूर अंतरावर काम असल्यास ने-आण करण्याची व सर्व सोयींनी युक्त असे कॅम्पस् काढून मजुरांच्या रहाण्याची सोय न करणे इत्यादी नित्याचे प्रकार झाले असून वर नमूद केलेल्या तरतुदींच्या अंमलबजावणीचा आग्रह धरल्यास दडपशाही व लुरुंगवास याला कामगारांना तोंड द्यावे लागते. अनेक कामे मंजूर केली आहेत असे दिमाखाने शासनाच्या वतीने जाहीर केले जाते. पण ती कामे निरनिराळी कारणे दाखवून सुरू केली जात नाहीत. उत्पादक कामांचा विचार करता कामे संपली आहेत असे म्हणणे वास्तवाला धरून नाही.

प्रत्येक गरजूला वर्षभर काम, काम न दिल्यास बेरोजगार भत्ता, तीन किलो मिटर पेक्षा दूर अंतरावर काम असल्यास जादा अंतराबद्दल भरपाईची तरतूद, त्या पेक्षा जास्त अंतरावरील कामावर नेण्या आणण्याची व दूर अंतरावर काम असल्यास मजूरांच्या मुलांकरिता शिक्षणासह सर्व सोयींनी युक्त अशा कॅम्पसची व्यवस्था. इत्यादी सोयींची स्पष्ट तरतूद करण्यात येऊन त्यांची काटेकोर अंमलबजावणी झाली पाहिजे. दर महिन्यात किमान दोन वेळा कॅम्पवरून घरी नेण्याआणण्याची व्यवस्था सरकारने केली पाहिजे. अशी या परिषदेची मागणी आहे.

१९७८–७९ सालात "कामासाठी अन्न" योजनेखाली रोजगार हमी कामगारांना दररोज किमान एक किलो व कामाच्या वाढीबरोबर दहा किलो पर्यंत सकस धान्य सवलतीच्या दराने देण्याचे धोरण स्विकारण्यात आले. त्यानंतर त्या नियमात बदल करून ते एक किलो ऐवजी अर्धा किलो व केंद्र सरकारकडून अपुरा धान्य पुरवठा होतो हे कारण दाखवून धान्यासाठी केवळ २५ पैशाची कुपन्स देण्याची पद्धती अवलंबविण्यात आली. शेतमजूर व रोजगार हमी कामगारांच्या रहाणी खर्चात अन्नधान्यावरचा खर्च हा मुख्य घटक असल्याने धान्यपुरवठयातील कपात हा शेतमजूर व रोजगार हमी कामकागारांच्या जीवनमानावर हल्ला असून धान्य कपात म्हणजे वेतन कपात आहे. या सरकारचे धोरण बडया व सधन शेतकऱ्यांना पक्षपाती असल्याने पूर्वीचे धान्यवाटपाचे धोरण मागे घेण्यात आले. फेब्रुवारी १९८१ पर्यंत चालू होते त्याप्रमाणे रोजगार हमी कामगारांना सकस धान्य पुरवठा ताबडतोब सुरू करावा, त्याचप्रमाणे जीवनावश्यक सर्व वस्तू रोजगार हमी कामगार, शेतमजूर आदि घटकांना सवलतीच्या दराने सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत पुरविण्यात आल्या पाहिजेत.

मजूरांची नव्याने नांवे नोंदविण्याचे आदेश दिले, त्याला प्रथम ३० सप्टेंबर ही अखेरची तारीख देण्यात आली. यावेळेत सरकारी यंत्रणा कांहीच करू शकली नाही. म्हणून ३० आक्टोंबर १९८४ अखेरपर्यंत नांवे नोंदविण्याची वेळ वाढविण्यात आली असली तरी दवंडी न देणे, नांव नोंदणीचे छापील अर्ज गांव कार्यालयात नसणे, नांवे नोंदविण्यास गरजू कामगार कार्यालयावर गेल्यास कार्यालयात तलाठी अगर ग्रामसेवक हजर नसणे, नांव नोंदणी करण्यास नकार देणे, असा सार्वत्रिक अनुभव आहे. या संबंधात महाराष्ट्र सरकार व शासन यंत्रणा यांची रोजगार हमी योजनेकडे व बेरोजगार अशा श्रमिकांच्याकडे पहाण्याची दृष्टी किती बेफिकिरीची आहे हेच

१९७८–७९ सालात " कामासाठी अन्न " योजनेखाली रोजगार हमी कामगारांना दररोज किमान एक किलो व कामाच्या वाढीबरोबर दहा किलो पर्यंत सकस धान्य सवलतीच्या दराने देण्याचे धोरण स्विकारण्यात आले. त्यानंतर त्या नियमात बदल करून ते एक किलो ऐवजी अर्धा किलो व केंद्र सरकारकडून अपुरा धान्य पुरवठा होतो हे कारण दाखवून धान्यासाठी केवळ २५ पैशाची कुपन्स देण्याची पद्धती अवलंबविण्यात आली. शेतमजूर व रोजगार हमी कामगारांच्या रहाणी खर्चात अन्नधान्यावरचा खर्च हा मुख्य घटक असल्याने धान्यपुरवठयातील कपात हा शेतमजूर व रोजगार हमी कामकागारांच्या जीवनमानावर हल्ला असून धान्य कपात म्हणजे वेतन कपात आहे. या सरकारचे धोरण बडया व सधन शेतकऱ्यांना पक्षपाती असल्याने पूर्वीचे धान्यवाटपाचे धोरण मागे घेण्यात आले. फेब्रुवारी १९८१ पर्यंत चालू होते त्याप्रमाणे रोजगार हमी कामगारांना सकस धान्य पुरवठा ताबडतोब सुरू करावा, त्याचप्रमाणे जीवनावश्यक सर्व वस्तू रोजगार हमी कामगार, शेतमजूर आदि घटकांना सवलतीच्या दराने सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत पुरविण्यात आल्या पाहिजेत.

मजूरांची नव्याने नांवे नोंदविण्याचे आदेश दिले. त्याला प्रथम ३० सप्टेंबर ही अखेरची तारीख देण्यात आली. यावेळेत सरकारी यंत्रणा कांहीच करू शकली नाही. म्हणून ३० आक्टोंबर १९८४ अखेरपर्यंत नांवे नोंदविण्याची वेळ वाढविण्यात आली असली तरी दवंडी न देणे, नांव नोंदणीचे छापील अर्ज गांव कार्यालयात नसणे, नांवे नोंदविण्यास गरजू कामगार कार्यालयावर गेल्यास कार्यालयात तलाठी अगर ग्रामसेवक हजर नसणे, नांव नोंदणी करण्यास नकार देणे, असा सार्वत्रिक अनुभव आहे. या संबंधात महाराष्ट्र सरकार व शासन यंत्रणा यांची रोजगार हमी योजनेकडे व बेरोजगार अशा श्रमिकांच्याकडे पहाण्याची दृष्टी किती बेफिकिरीची आहे हेच

यावरून सिद्ध होते. केव्हाही नांव नोंदवण्याचा व कामाची मागणी करण्याचा लोकांचा हक्क अबाधित राहिला पाहिजे. अशी या परिषदेची मागणी आहे.

रोजगार हमी कायद्यानुसार तालुकावार, जिल्हावार समित्या नियुक्त करावयाच्या असून त्या समित्यावर शेतमजूरांच्या रजिस्टर्ड संघटनांचे प्रत्येकी दोन प्रतिनिधी घ्यावेत अशी तरतूद आहे, पण बहुतेक ठिकाणी संघटनांचे प्रतिनिधी घेतलेले नाहीत. ही संतापजनक बाब आहे. तरी शेतमजुरांच्या संघटनांचे प्रतिनिधींची नियुक्ती त्या त्या संबंधित समित्यावर ताबडतोब करण्यात यावी, काम न दिल्यास महागाई भत्यासह त्या त्या वेळी जाहीर केलेले वेतन असेल त्याच्या निम्मी रक्कम निर्वाह भत्ता म्हणून देण्यात यावी. २ ऑक्टोबर १९८४ पासून काम न दिल्यास रोज २ रु. निर्वाह भत्ता दिला पाहिजे व शासनाने त्यात वाढ करण्याबाबत ताबडतोब फेरविचार करावा असा निर्णय उच्च न्यायालयाने दिला आहे. त्याचप्रमाणे उच्च न्यायालयाच्या सूचनेनुसार बेरोजगार भत्ता देण्याची पद्धती साधी व सुटसुटीत करण्यात यावी अशी या परिषदेची मागणी आहे.

१ फेब्रुवारी १९८३ ते ८ मार्च १९८३ या काळात महाराष्ट्र-भर रोजगार हमीचे कामावर काम केलेल्या मजुरांना वेतनातील फरक देण्यासाठी उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाला सरकारनेही मान्यता दिली आहे. तरी जेथे फरक दिला नसेल तेथे फरक देण्याची व्यवस्था तात्काळ करावी, त्याचबरोबर रोजगार हमी वरील सर्व कामांचे दरात शेतमजूर किमान वेतन वाढीच्या प्रमाणात बदल करून त्याचा फरकही देण्यात यावा. या संदर्भात उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय, राज्याच्या रोजगार हमी कौन्सिलने त्या संबंधात केलेला ठराव व शासनाने बांधकाम मजूरांचे ५ ऑक्टोबर १९८४ पासून नव्याने निर्धारित केलेले किमान वेतन लक्षात घेता रोजगार

हमी मजुरांचे दर नव्याने निर्धारित करण्यात येऊन त्याची अंमलबजावणी करण्याची पावले जलदीने टाकावीत. रोजगार हमी कामावर १५० दिवस काम केलेल्या स्त्री मजुरांना बाळंतपणाची एक महिन्याची पगारी रजा देण्याचा सध्या नियम आहे. कामेच नियमित मिळत नाहीत. हे लक्षात घेता ९० दिवस काम केले असेल तर बाळंतपणाच्या रजेची सवलत द्यावी, तसेच प्रत्येक रोजगार हमी कामगाराला कार्ड देण्यात यावे व त्या कार्डावर त्याने केलेल्या कामाच्या मोजमापांचा तपशील, कामांचे दिवस, पगार आदींची नोंद करावी. रोजगार हमी कामावर कांही ठिकाणी मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे दिसून आले आहे. भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी या संदर्भात गवई समितीने केलेल्या शिफारशींची तावडतोब अंमलबजावणी करावी.

रोजगार हमीसाठी नोंदलेली नांवे व कामाची केली जाणारी मागणी लक्षात घेऊन कामाची पहाणी व आखणी करून जिल्हाधिकाऱ्यांनी मागणी करणाऱ्यांना वर्षभर पुरेल इतक्या कामांची निळप्रत तयार करावी. तसेच निळप्रत तयार करण्याची कायद्यात तरतूद असताना अशा निळप्रती तयार केल्या जात नाहीत. निळप्रती तयार करताना जिल्हा वा तालुका शेतमजूर, रोजगार हमी कामगार संघटनांच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी विचारात घ्याव्यात. दोन वर्ष पुरतील इतक्या कामांची पहाणी, आखणी व मंजूरी इत्यादि गोष्टी पूर्ण करून जिल्हावार निळप्रती तयार कराव्यात व त्याच्या प्रती शेतमजूर संघटनांना उपलब्ध करून देण्यात याव्यात, तसेच ५ किलोमीटरच्या आतील मंजूर कामांची यादी त्या क्षेत्रातील ग्रामपंचायतीच्या कार्यालयात व तालुक्यातील मंजूर कामांची यादी तहशील कचेरी व पंचायत समिती कार्यालयात सर्वांच्या माहितीसाठी ठळक जागी प्रसिद्ध करावी. रोजगार हमी कायद्यातील तरतुदींप्रमाणे रोजगार हमी वरील अकुशल कामगारांच्या कुशलतेच्या प्रशिक्षणाची आणि त्यांचा दर्जा उंचावण्याकरीता विविध कार्यक्रमांची त्वरीत

अंमलबजावणी करून कुशल बांधकामे, कुटीरोद्योग व ग्रामोद्योगाच्या कामांचाही निळप्रतीत समावेश करण्यात यावा.

रोजगार हमी योजने संबंधी सरकार व सरकारी यंत्रणेची जी बेफिकीरीची व टाळाटाळीची वृत्ती आहे ती बदलण्यासाठी आणि योजनेतील उणीवा दूर करून वर नमूद केलेल्या मागण्यांच्या पूर्तते-साठी शेतमजूर व रोजगार हमी कामगारांना तीव्र आंदोलन करावे लागेल असा इशारा ही परिषद देत असून या आंदोलनासाठी सर्व शेतमजूर व रोजगार हमी कामगारांनी सज्ज रहावे असे आवाहन ही परिषद करीत आहे.

## केंद्र सरकारचा ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम (RLEGP)

केंद्र सरकारने लागू केलेल्या या कार्यक्रमाच्या नांवात रोजगार हमी असे शब्द जरी वापरले असले तरी प्रत्यक्षात ही हमी मजुरांना मिळावी या करीता कोणतीच तरतूद करण्यात आलेली नाही. या बाबत ही परिषद तीव्र निषेध व्यक्त करून मागणी करते की या कार्य-क्रमांतही महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेप्रमाणे मजुरांनी कामाची मागणी करणे, मागितल्यावर १५ दिवसांचे आत काम देणे व काम न मिळाल्यास बेरोजगार भत्त्याची स्पष्ट तरतूद करण्यात यावी.

## ठराव ३ : शेतमजूरांसाठी सर्वंकष कायदा–

शेतमजूर हा देशातील श्रमिकांपैकी सर्वात मोठा विभाग आहे. शेतीक्षेत्राच्या व राष्ट्राच्या विकास कार्यात मोलाची भर टाकणारा हा विभाग असून देशातील सर्वात नाडला व दडपला गेलेला विभाग आहे. या विभागाला त्याचे वेतन, कामाची शाश्वती, आठवडयाच्या सुट्या आजारीपणाच्या, बाळंतपणाच्या रजा, म्हातारपणासाठी

प्रॉव्हीडंट फंड अथवा पेन्शन अशा कोणत्याच सामाजिक सुरक्षिततेच्या सुविधा नाहीत. अलिकडील काळात शेतमजुरांसाठी किमान वेतनाचे काही कायदे झाले आहेत. पण ते अतिशय तुटपुंजे, अशास्त्रीय पाया-वर आधारलेले व शेतमजुरांची उपासमार कायम ठेवणारे आहेत. महागाईपासून संरक्षण देणारे नाहीत. किंवा अपुरे आहेत. आणि त्याची अंमलबजावणी आज क्वचितच होत आहे. आज शेतमजूर चळवळीच्या दडपणाखाली कांही राज्यात वृद्धापकाळासाठी पेन्शन, शेतमजूर स्त्रियांना बाळंतपणासाठी सवलती तर कोठे अपघाताबद्दल नुकसान भरपाई इत्यादी फुटकळ तरतुदी झाल्या आहेत. पण त्याचीही अंमलबजावणी यंत्रणा अस्तित्वात नाही अथवा असावी अशी कार्य-क्षम नाही. शेतमजुरांना संघटित होण्याचे दृष्टीने कायद्याचे अधिक संरक्षण देण्याची आवश्यकता असताना औद्योगिक कलह कायद्याखाली जे अपुरे संरक्षण त्याला लाभले होते तेही काढून घेण्याचे प्रतिगामी पाऊल भारत सरकारने उचलले आहे. या गोष्टीचा ही परिषद सक्त निषेध करत असून शेतमजुराला या कायद्यांच्या कक्षेतून वगळण्याची केलेली दुरुस्ती त्वरित रद्द करावी. अशी या परिषदेची मागणी आहे.

शेतमजुरांसाठी योग्य किमान वेतन, त्याची काटेकोर अंमल-बजावणी त्यांना कामाची अथवा काम न मिळाल्यास निर्वाह भत्त्याची शाश्वती, भरमसाठ वाढलेल्या व वाढत जाणाऱ्या महागाईपासून संरक्षण आणि जीवनावश्यक वस्तूंचा पुरेसा व स्वस्त दरात पुरव-ठ्याची तरतूद, आजारीपण, बाळंतपणाच्या रजा, सुट्या, औषध-पाण्याची सोय, म्हातारपणासाठी प्राव्हीडंट फंड, पेन्शन, अपघाता-पासून संरक्षण या सर्व गोष्टींची शीघ्र अंमलबजावणी होईल व त्यासाठी त्याला वर्ग पायावर संघटित होण्याचा अधिकार दिला जाईल असा एक सर्वंकष कायदा केंद्र सरकारने करावा अशी मागणी शेतमजूर संघटना सातत्याने करीत आल्या आहेत.

वेळोवेळी आश्वासने देऊनही या बाबतीत केंद्र सरकारने कोणतेही पाऊल उचलले नाही. प्रस्थापित केंद्र सरकारने असा

कायदा करणार असल्याचे जाहीर करून निरनिराळ्या राज्यांचे अभिप्राय मागण्याचा फार्स केला आणि प्रत्यक्षात त्याबद्दल एकमत होत नाही या सबबीखाली असा कायदा करण्याची जबाबदारी राज्य सरकारवर टाकून या बाबतीतील आपली जबाबदारी टाळली आहे. या बाबतीत केंद्राची जबाबदारी की राज्याची जबाबदारी या वादात गुंतवून न घेता औद्योगीकदृष्ट्या पुढारलेल्या व शेती क्षेत्रातही प्रगतीपथावर असलेल्या महाराष्ट्र राज्यानेच केरळच्या पावलावर पाऊल टाकून असा कायदा करावा अशी मागणी परिषद ही करत आहे.

शेतमजूर चळवळीच्या आजच्या अवस्थेत स्थानिक पातळीवर शेतमजूर व रोजगार हमी कामगारांत काम करणाऱ्या निरनिराळ्या लहान मोठ्या व्याप्तीच्या सर्व संघटनांच्या सहकार्याने, एक विचाराने व व्याप्तीने त्यांना राज्याच्या पायावर संघटित करणे आवश्यक आहे. अशा स्वरूपाच्या व्यापक एकजुटीच्या पायावर संघटीत झालेल्या चळवळी व संघटना राज्य सरकारवर परिणाम करणाऱ्या व देशव्यापी आंदोलनाचा मजबूत पाया घालणाऱ्या ठरणार आहेत. म्हणून ही राज्य परिषद शेतमजूर व रोजगार हमी कामगारांच्या इतर प्रश्नाबरोबरच "शेतमजुरांसाठी सर्वंकष कायदा ताबडतोब करा" अशी मागणी करीत असून या मागणीच्या पूर्ततेसाठी जरूर तर ती संघर्ष करण्याचा निर्धार करीत आहे.

## ठरार ४ : अतिक्रमित व हस्तांतरित जमीनीचा प्रश्न

महाराष्ट्र सरकारने ३१ मार्च १९७८ पूर्वी ज्या भूमिहीनांनी सरकारी जमिनीवर अतिक्रमण करून ती वहीत केली असेल ती सर्व जमीन त्या त्या व्यक्तीच्या नावे नियमित करून तसे पट्टे भूमिहिनांना द्यावेत अशा प्रकारचा निर्णय केला होता पण या निर्णयाचा फायदा

फारच थोड्या भूमिहिनांना झाल्याचे दिसून येते. कारण भूमिहिनांनी अतिक्रमण केल्या संबंधीचा पुरावा सादर केला पाहिजे. किंवा सरकारी दप्तरामध्ये अतिक्रमणाची नोंद झाली पाहिजे अशा प्रकारची अट सरकारी नियमामध्ये होती, अतिक्रमणाचा पुरावा म्हणून शासनाकडे दंड भरल्याच्या पावत्या सादर कराव्यात अशी अट होती. पण बऱ्याच ठिकाणी अतिक्रमणाचे खटले न भरता किंवा सरकारी कागद पत्रात तशी नोंद न करता भूमिहिनांना ती जमीन कसू दिली त्यामुळे वर नमूद केलेले पुरावे सादर करणे शक्य न झाल्यामुळे ७८ च्या निर्णयाचा फायदा ज्या भूमिहिनांना व्हायला पाहिजे अशांना मिळालेला नाही. महाराष्ट्रातील पु. लो. द. सरकारने १ एप्रिल १९७२ ते ३१ मार्च १९७८ या दरम्यान सरकारी जमिनीवर केलेले अतिक्रमण रीतसर करण्याचा कायदा केला, परंतु या कायद्याचा फायदा फारच थोड्या अतिक्रामकांना झाल्याचे दिसते.

याच सोबत १९६० ते १ एप्रिस १९७२ या दरम्यान केलेली अतिक्रमणे रितसर करण्यासंबंधी काही तरतूद केली नसल्यामुळेही अनेक अतिक्रामकांना या कायद्याचा काही उपयोग झाला नाही.

गेल्या काही वर्षात तर असे लक्षात आले आहे कि शेतमजूर, गरीब शेतकऱ्यांनी व भूमिहिनांनी अतिक्रमण करून वहित केलेल्या जमिनी मधील उभ्या पिकात गावातील बडे व सधन लोक आपली जनावरे घुसवून भूमिहिनांची पिके उध्वस्त करतात आणि शासकीय अधिकारी या संदर्भात गरीब भूमिहिनांना संरक्षण न देता बड्या सधन मंडळींनाच पाठीशी घालतात. आणि त्यामुळे गावागावात सामाजिक तणाव वाढत चालल्याचे दिसून येते अशा रितीने उध्वस्त केल्या जाणाऱ्या पिकांची नुकसान भरपाई शासनाने द्यावी अशी मागणी ही परिषद करीत आहे.

वस्तुतः जे भूमिहीन सरकारी जमिनीत अतिक्रमण करतात त्यांना उपजिवीकेचे अन्य कोणतेही साधन नसल्यानेच नाइलाजाने

या मार्गाचा त्यांना अवलंब करावा लागतो. या प्रकारच्या मुळाशी खरे म्हणजे शेतजमिनीच्या न्याय्य वाटपाचा प्रश्न आहे. परंतु त्याची तातडतोब तड लागणे कठीण असल्याने ज्या भूमिहिनांनी आपल्या उदरनिर्वाहासाठी सरकारी जमिनीवर ३१–१२–८४ अखेर अतिक्रमण करून ती वहित केली असेल त्या सर्व जमिनी १९७८ च्या सरकारी आदेशातील तरतुदीप्रमाणे नियमीत करून त्याचे पट्टे भूमिहिनांच्या नांवे करून द्यावेत अशी मागणी ही परिषद करीत आहे.

आदिवासी लोकाच्या जमिनी बिगर आदिवासी लोकांच्याकडे हस्तांतरीत झाल्या असतील तर त्या मूळ आदिवासी मालकाकडे परत द्याव्यात असा कायदा शासनाने मंजूर केला परंतु न्यायालयीन हरकती व यंत्रणेचा गाफीलपणा आणि साधना बाबतची आत्मियता यामुळे या कायद्यातील तरतुदींची सुरूवातीस नीट अंमलबजावणी झाली नाही व सधनांनी त्या मार्गात अनेक कायदेशीर अडचणी उभ्या केल्या व सदर कायदा घटनाबाह्य आहे या मुद्द्यावर अंमलबजावणी-वर स्थगिती आणली. नुकताच सर्वोच्च न्यायालयाने सदर कायदा घटनाबाह्य नाही असा निकाल दिलेला आहे त्यामुळे कायदेशीर अड-चणी दूर झाल्या आहेत; तेव्हा आता या कायद्याची सक्तीने व त्वरेने अंमलबजावणी करण्यात यावी अशी आग्रही मागणी ही परि-षद करत आहे.

आदिवासी प्रमाणेच कनिष्ठ गाव कामगारांची वतने नष्ट करण्याच्या कायद्यान्वये मोकळया झालेल्या जमीनी दलिताच्या अड-चणीचा गैरफायदा घेऊन बेकायदेशीर दडपणे आणून किंवा दंडेलीने सधनांनी आपल्या ताब्यात घेतल्या. त्यामुळे त्यांचे उपजिवीकेचे साधनच नष्ट झाले आहे. त्याचप्रमाणे गावोगावी आदिवासी व दलिता व्यतिरिक्त गरीब सवर्णाच्याही जमिनी सधनांनी खंड, बाटा, सावकारी आणि दादागिरीच्या जोरावर हडप केलेल्या आहेत. तरी शासनाने दलिताच्या व अन्य गरीबांच्या हस्तांतरित जमिनी पुन्हा

मूळ मालकांना मिळण्याच्या दृष्टीने आदिवासींसाठी केलेल्या कायद्याच्या धर्तीवर कादेशीर तरतूद करावी व हे सर्व कायदे घटनेच्या ९ व्या परिशिष्टात समाविष्ट करावेत अशी मागणी ही परिषद करत आहे.

अतिक्रमित व हस्तांतरित जमिनीबाबत वर सुचवल्याप्रमाणे त्वरित उपाययोजना शासनाने केली नाही तर भूमिहीन, शेतमजूर, आदिवासी, दलित व गरीब जनता यांना प्रखर आंदोलन करावे लागेल असा इशाराही ही परिषद देत आहे.

## ठराव ५ : वेठबिगारांची मुक्तता व पुनर्वसन—

आणिबाणीच्या काळात वेठबिगारांची मुक्तता करण्याचा कायदा झाला पण या कायद्याची योग्य अंमलबजावणी होत नाही असे ही परिषद खेदपूर्वक नमूद करीत आहे.

या कायद्यातील व्याख्येनुसार वेठबिगार महाराष्ट्र राज्यात नाहीतच असे जाहीर झाले होते. वेठबिगारीची अनेकरूपे महाराष्ट्रात वावरतात. सार्वजनिक व खाजगी, बड्या इमारती, पूल, धरणे व कालवे यांच्या कंत्राटदारामार्फत होणाऱ्या बांधकामावर वेठबिगारी पद्धत आस्तित्वात आहे. परंतु यंत्रणा याकडे लक्ष देत नाही. शेतमजुरांपैकी सालदार, महिनेदार, म्हणून काम करणाऱ्यांपैकी काही मुले व प्रौढांना लग्न, आजारपण अथवा अन्य धार्मिक कारणे अथवा कौटुंबिक आपत्तीसाठी काढलेल्या कर्जापोटी वर्षानुवर्षे विनावेतनावर वा अल्प वेतनावर कामे करावी लागतात आदिवासी क्षेत्रात, विशेषत: ठाणे जिल्ह्यात लग्नगड्याची प्रथा आजही मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आहे. गांधी शांती प्रतिष्ठान व नॅशनल लेबर इंस्टीटयूट यांच्या पहाणीनुसार महाराष्ट्रत सुमारे एक लाख वेठबिगार गुलामीचे जिणे जगत आहेत. सरंजामशाहीचा अत्यंत घृणास्पद व

अमानवी असा हा अवशेष असून भारतीय समाजावरचा मोठा कलंक आहे.

"वेठबिगारी पद्धत ( उच्चाटन ) अधिनियम १९७६" हा वेठबिगारी नष्ट करण्यासाठी पुरेसा परिणामकारक आहे. कोणत्याही प्रकारची वेठबिगारी करवून घेणे हा दखलपात्र गुन्हा ठरविला असून, गुन्हा केलेला नाही हे सिद्ध करण्याची जबाबदारी आरोपीवर टाकण्यात आली आहे. हे खटले संक्षेपाने चालविण्याचे आहेत. तोंडी करार किंवा सामाजिक रूढीनुसार अस्तित्वात असलेला गृहीत करार मान्य करण्यात आला आहे. या कायद्याखाली गुन्हा सिद्ध झाल्यास तीन वर्षापर्यंत कैद आणि दोन हजार रुपयांपर्यंत दंडाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

कायदा पुरोगामी असूनही भारतामध्ये या कायद्यातील तरतुदीनुसार १९८३ पर्यंत एकालाही अटक किंवा आजवर एकालाही शिक्षा झालेली नाही. कायद्याच्या तरतुदींची पुरती माहिती शासकीय महसूल, पोलीस व कामगार खात्याच्या अधिकाऱ्यांना नाही. या कायद्याच्या अंमलबजावणीबाबत सर्व स्तरावर असह्य उदासीनता आहे. वेठबिगारांना शोधण्याचे, त्यांना मुक्त करण्याचे व त्यांचे पुनर्वसन करण्याचे अधिकार व कर्तव्ये ८ वर्षात देण्यास शासन विसरून गेले. खूप मोठ्या प्रयत्नानंतर ऑगस्ट ८४ मध्ये हे अधिकार राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. पुनर्वसनाची जी योजना अस्तित्वातच नव्हती ती देखील ऑगस्ट ८४ मध्ये लागू करण्यात आली.

या कायद्याखाली नेमलेल्या जिल्हावार समित्यांमध्ये शेतमजूर व रोजगार हमी कामगारांच्या तसेच इतर कष्टकरी संघटनांच्या प्रतिनिधींना समाविष्ट करावे, अशी मागणी ही परिषद करीत आहे.

आजवर महाराष्ट्र शासनाने दाखविलेल्या या प्रश्नावरील अक्षम्य उदासीनतेबाबत व विरोधी भूमिकेबाबत ही परिषद महाराष्ट्र शासनाचा निषेध करीत आहे व यापुढे अशीच भूमिका राहिल्यास ती सहन केली जाणार नाही, असा इशारा देत आहे. तसेच

वेठबिगारांच्या मुक्ततेच्या व पुनर्वसनाच्या कामी शेतमजूर व रोजगार हमी कामगारांनी संघटीतपणे पुढाकार घ्यावा असे आवाहन ही परिषद करीत आहे.

## ठराव ६ : घरांसाठी जागा व मदत–

भूमिहीन व शेतमजुरांना घरासाठी जागा देण्यासाठी कार्यक्रम अग्रक्रमाने व गंभीरपणे पार पाडावा अशा सूचना केंद्र सरकार वेळोवेळी राज्य सरकारांना करत असल्याचे प्रसिद्ध होते. परंतु हा कार्यक्रम पुरेशा तातडीने पार पाडला जात नाही असे ही परिषद नमूद करीत आहे.

प्रत्येक गावातील स्वतःचे घर नसलेल्या भूमिहीन शेतमजुरांना घर बांधणीसाठी जागा तात्काळ देण्यात यावी. या जागेवर टिकाऊ घर बांधण्यासाठी होणारा सर्व खर्च शासनाने सोसावा अशी मागणी ही परिषद करीत आहे. तसेच आतापर्यंत बांधलेल्या घरकुलांच्या झालेल्या पडझडीच्या दुरुस्तीसाठी शासनाने मदत करावी अशीही मागणी ही परिषद करीत आहे.

अनेक गावांमध्ये भूमिहीन-शेतमजूर बडे शेतकरी किंवा शेतमालक यांच्या खाजगी जागांवर अनेक वर्षापासून रहात आहेत. त्या जागा या भूमिहीन शेतमजुरांच्या नावावर करून देण्यासाठी खास कायदा करावा अशी मागणी ही परिषद करीत आहे.

घरांसाठी जागा शोधताना प्रथम गावठाणच्या मोकळ्या जागेस अग्रक्रम दिला पाहिजे. परंतु अनेक गावांमध्ये गावठाणच्या जागेवर गावातील सधन व बड्या शेतकऱ्यांनी आपली खळी किंवा वस्ती केलेली आहे. काही गावात तर या गावठाणातील वहितीलायक जमिनीवर या बड्यांनी अतिक्रमणे करून त्या वहितीखाली आणल्या आहेत.

तेव्हा गावठाणावरील बड्यांची ही अतिक्रमणे उठविण्याची मोहिम शासनाने घेऊन, ती त्वरित काटेकोरपणे अंमलात आणावी

व त्या जागांचा बेघरांना घरे बांधण्यासाठी वापर करावा कशीही मागणी ही परिषद करीत आहे.

तसेच ज्या गावी गावठाणात जागा शिल्लक नसेल तेथे गावाच्या जवळपासची जागा बेघरांना देण्यात यावी व अशा वस्त्यांच्या ठिकाणी दिवाबत्ती, पाणी व इतर सुविधा देण्याची मागणी ही परिषद शासनाकडे करीत आहे.

## ठराव ७ : कृति विषयक–

शेतमजूर व रोजगार हमी कामगार समन्वय समिती (महाराष्ट्र) ही परिषद निव्वळ मागण्या मागून अथवा केवळ त्यासंबंधी ठराव करून आपल्या या मागण्यांची व ठरावांची पूर्तता होईल असे आजवरच्या अनुभवावरून मानत नाही. महाराष्ट्र राज्यातील शेतमजूर, रोजगार हमी कामगारांनी गांवोगांव संघटित होऊन एकजूट करून एकदिलाने व हितसंबंधियांविरोधी संघर्षाची तयारी केल्याखेरीज ही गोष्ट घडणार नाही. असे या परिषदेचे ठाम मत आहे.

आपल्या मागण्यांचा संघटित आवाज उठवण्यासाठी तारीख **५ फेब्रुवारी** रोजी "शेतमजूर रोजगार हमी कामगार मागणी दिन" पाळण्याचा निर्धार ही परिषद व्यक्त करीत आहे. त्या दिवशी सर्व शेतमजूर, सालदार, महिनेदार व रोजगार हमी कामगार आदि कामगारांनी आपल्या गरीब शेतकरी, निमशेतमजूर आदी दोस्त शक्तींना बरोबर घेऊन गावोगांव अथवा विभागवार सभा, निदर्शने, मोर्चे, आणि शक्य तेथे एक दिवसाचा संप करून हा दिन साजरा करावा व आपल्या संघटित शक्तीचे विराट प्रदर्शन घडवावे असे आवाहन ही परिषद करीत आहे. या मागणी दिनाच्या कार्यक्रमाचा आढावा घेऊन आपल्या मागण्यांच्या पूर्ततेसाठी लोकप्रतिनिधींना जाब विचारणे, सत्याग्रह करणे, विधानसभेवर निदर्शने करणे, सरकारी कामकाज बंद पाडणे वगैरे सबंधीचा तपशीलवार कार्यक्रम समन्वय समितीने ठरवावा असा आदेश ही परिषद देत आहे व तो कार्यक्रम अंमलात आणण्यासाठी सर्व संबंधितांनी ( ग्रामीण कार्यकर्त्यांनी ) आतापासून कामाला लागावे असे आवाहन ही परिषद करत आहे

## शेतमजूर व रोजगार हमी कामगार समन्वय समितीच्या वतीने भरलेली पहिली राज्यव्यापी परिषद कोपरगांव दि. १२-१२-८४

# बा. न. राजहंस यांचे उद्घाटनाचे भाषण

**परिषदेचे अध्यक्ष मंडळ सहकारी कार्यकर्ते व शेतमजूर आणि रोजगार हमीवरील कामगार बंधूनो आणि भगिनींनो–**

गेले तीनचार वर्षे महाराष्ट्रात शेतमजूर व रोजगार हमी कामगारामध्ये काम करणाऱ्या निरनिराळ्या संघटनाना एकत्र आणून या वर्गाचे प्रश्न धसाला लावण्यासाठी एक व्यासपीठ समन्वय समितीच्या रुपाने आपण उभे केले आहे. या व्यासपीठाचे वतीने आपण महाराष्ट्र विधान मंडळासमोर दोन वेळा धरणे, एक दिवस राज्यव्यापी संप केला व राज्यात अनेक ठिकाणी आपल्या शक्तिप्रमाणे निदर्शने घडवून आणली. शेतमजुरांच्या किमान वेतनाचा प्रश्न न्याय आधारावर व आपल्या समाधानाप्रमाणे सुटत नाही तरी शासनाला त्या प्रश्नाचा विचार करण्याची गरज भासावी एवढे शक्ति प्रदर्शन करण्यास आपणास यश आले आहे. तसेच रोजगार हमी कामगारांना कायद्याप्रमाणे वेतन मिळावे, त्यांच्या वेतनातील मागील फरक मिळावा, बेकार भत्त्याची रक्कम वाढवून मिळावी, रोजगार हमीवर काम करणाऱ्या स्त्रियांना बाळंतपणाची सवलत मिळावी वगैरे काही गोष्टी प्राप्त करून घेण्यात आपणास यश आले आहे. परंतु अद्यापही मागेल त्याला कायद्याप्रमाणे काम मिळत नाही, कित्येक वेळा मागितल्यानंतर कामासाठी महिनोनमहिने थांबावे लागते, अनेकांना कामासाठी पाच किलोमीटरपेक्षा जादा अंतर तुडवावे लागते, पण त्यांना कँपच्या किंवा नेण्या-आणण्याची व्यवस्था करण्याची सवलत मिळत नाही. शेतमजुरांच्या किमान वेतनाचा पुनर्विचार करण्याचे शासनाने मान्य केले असले तरी त्याची अंमलबजावणी करण्याची यंत्रणा अगदी कुचकामी व परिणामशून्य आहे.

याचे कारण शासनावर दडपण आणण्याइतकी आपली शक्ति वाढलेली नाही, म्हणून आज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून हजारो प्रतिनिधींना एकत्र बोलावून या प्रश्नांचा विचार करण्याचे आपण ठरवले आहे.

## संख्येने प्रचंड आहोत !

वस्तुत: शेतमजूर व रोजगार हमी कामगार यांची संख्या फार मोठी आहे. सर्व संघटित व औद्योगिक कामगारापेक्षा कितीतरी पटीने अधिक आहे. पण आपण पुरेसे जागृत व संघटित नसल्यामुळे किंवा आपण किती आहोत याची आपणासच नीट कल्पना नसल्यामुळे आपला शासनाच्या किंवा राजकीय पक्षांच्या धोरणावर प्रभाव पडत नाही. म्हणून आपली संभाव्य शक्ति किती मोठी आहे व आपले मुख्य प्रश्न कोणते व ते सरकारतर्फे कसे दुर्लक्षित आहेत याचे विवेचन मी आज करण्याचे योजले आहे.

१८९२ साली भारतामधील भूमिहीनांची संख्या फक्त ७५ लक्ष होती ती १९६१ साली ३ कोटी १४ लक्ष व १९७१ साली ४ कोटी ७३ लक्ष एवढी वाढली. देशातील एकूण श्रम करणाऱ्या संख्येशी शेतमजुरांचे प्रमाण २५.७६% आहे महाराष्ट्रापुरते बोलायचे झाले तर १९६१ साली शेतमजुरांची संख्या ४५ लक्ष होती. ती १९८० साली ६५ लक्षावर गेली आहे महाराष्ट्रात एकूण श्रम करणाऱ्यांत शेतमजुरांचे प्रमाण ९३.३% आहे. हे सर्व लोक संपूर्णपणे भूमिहीन असून त्यांना उपजिवीकेसाठी मजुरीशिवाय कोणतेही साधन उपलब्ध नाही. १८४० साली जी शिरगणती झाली त्या वेळी भारतामध्ये एकही भूमिहीन नव्हता असा त्या शिरगणती अहवालात स्पष्ट उल्लेख आहे. पण लोकसंख्येची भरमसाठ वाढ, जमिनीत अधिक लोकांचा भार, सावकारांच्या व जमिनदारांच्या वाढत्या खंडाची मागणी व जमिनीचे दिवसेंदिवस होणारे लहान लहान तुकडे यामुळे लक्षावधी कुळांना व छोटया शेतकऱ्यांना आपले जमिनीवरचे हक्क गमावून भूमिहीन व्हावे लागले व ते शेतमजुरांच्या रांगेत येऊन बसले.

## तरूण व स्त्रियांचे प्रमाण अधिक

शेतमजुरांमध्ये दलित जाती आणि आदिवासी जमातींमधील लोकांचा भरणा फार मोठा आहे तसेच शेतमजुरांमध्ये स्त्रियांचे प्रमाणही फार मोठे आहे. १९६१ च्या पहाणीनुसार महाराष्ट्रात एकूण शेतमजुरांमध्ये स्त्रियांचे प्रमाण ४७·७% होते व याचे दृष्टीने विचार केला तर शेतमजुरांमध्ये १४ वर्षाखालील मुलांचे प्रमाण १०% आहे त्यापैकी ४५% मुली आहेत. एकूण शेतमजुरांत तरुणांचा भरणाच जास्त दिसून येतो. महाराष्ट्रातील शेतमजुरांत १५ ते ३५ या वयोगटातील प्रमाण ४७% आहे. ६० वर्षांचे वर असलेल्या शेतमजुरांचे प्रमाण फक्त ४·६३% आहे.

शेतमजुरांतील दलित समाजाचे प्रमाणाचा विचार केला तर महाराष्ट्रातील शेतमजुरांत १३% लोक दलित जातींचे व १२% लोक आदिवासी समाजातील आहेत बाकीचे ७५% शेतमजूर इतर जातीचे आहेत. १९७० साली जातीनिर्मूलन संस्थेने महाराष्ट्रात जी पाहणी केली त्यानुसार दलित समाजात ४८% लोक शेतमजुरीवर जगतात असे दिसून आले. त्यातही महार, नवबौद्ध व मातंग या समाजात शेतमजुरांचे प्रमाण जास्त आहे. महारांपैकी ५४·४५% व मातंगापैकी ५७·७९% कुटुंब केवळ शेतमजुरीवर अवलंबून आहेत.

## कामाची अ-शाश्वती

शेतमजुरांना ज्या पद्धतीने काम मिळते त्यावरून त्यांचे १) रोजंदारीने काम करणारे, २) सालदारी किंवा महावारी पद्धतीने व ३) कंत्राटी पद्धतीने काम करणारे असे तीन प्रकार पाडता येतील. यापैकी रोजंदारीने काम करणाऱ्या मजुरांचे काम अत्यंत अस्थिर व मोसमी स्वरूपाचे असते. विशेषतः जिराईत शेतीमध्ये जरूर लागेल तेव्हाच शेतमजूर घ्यावयाचे अशी प्रथा आहे ज्याच्याकडे बारमाही बागाईत आहे, किंवा ज्याच्याकडे पुष्कळ जमीन व मोठा बारदाना असतो, किंवा जे शेतमालक अन्य व्यवसाय करतात

अशांचेकडे सालाने किंवा महिन्याने कायम मजूर लावण्याची प्रथा आहे. अशा सालदारांना वर्षाचा मोबदला एकदम ठरविण्यात येतो. या सालदारांमध्ये लहान मुलांचा भरणा मोठ्या प्रमाणात असल्याचे आढळून येते. तसेच अनेक सावकार किंवा बडे शेतकरी गरीब व आदिवासी लोकांना दिलेले कर्ज फेडून घेण्यासाठी त्यांच्याकडून वर्षानुवर्षे वेठबिगारीनें काम करून घेतात. सालदारांना शेतावरची व घरची अशी दोन्ही प्रकारची कामे करावी लागतात. त्यांना सकाळी पाच वाजल्यापासून रात्री ११ वाजेपर्यंत काम करावे लागते. त्यांना रजा किंवा सुट्या मिळत नाहीत. कित्येक ठिकाणी सालदारांना रोख मोबदल्याबरोबर धान्य, कपडे, पादत्राणे वगैरे देण्याची प्रथा आहे. बऱ्याच ठिकाणी सालदारांकडून १३ महिने काम करून घेऊन त्यांना १२ महिन्याचा मोबदला मिळतो.

## वर्षातून ४–५ महिने काम नाही

रोजंदारीवर काम करणाऱ्या शेतमजुरांना वर्षातून किती दिवस काम मिळते याचीही पाहणी शासनाने केली आहे यावरून या क्षेत्रात सुद्धा बेकारी केवढ्या मोठ्या प्रमाणात आहे हे दिसून येईल. १९७४–७५ साली भारत सरकारच्या शेतमजूर विषयक आयोगाने जी पहाणी केली, त्यात असे आढळून आले की, ज्याच्याजवळ थोडीशी जमीन आहे अशा शेतमजुरांना वर्षातून १५२ दिवस शेतीवर आणि २८ दिवस बिगरशेतीचे काम मिळते. काही दिवस ते आपल्या तुटपुंज्या शेतीवर काम करतात. जे संपूर्ण भूमिहीन आहेत त्यांच्यापैकी पुरुषांना १६६ दिवस शेतीवर आणि २९ दिवस बिगर शेतीवर व स्त्रियांना १२६ दिवस शेतीवर तर १० दिवस बिगर शेतीवर काम मिळते. याचा अर्थ असा की, शेतमजुरांपैकी पुरुष वर्षातून सरासरी ४ ते ५ महिने आणि स्त्रिया सरासरी ६ ते ७ महिने बेकार असतात अर्थात ही गोष्ट सालदारांना लागू नाही. पण शेतमजुरात सालदारांचे प्रमाण

अत्यल्प असते. शेतमजूर आयोगाच्या पहाणीनुसार महाराष्ट्रात रोजंदारीने काम करणाऱ्या शेतमजुरांचे प्रमाण ८३% तर सालदारीने किंवा महावारीने काम करणाऱ्यांचे प्रमाण फक्त १७% आहे.

## वार्षिक उत्पन्न ७२२.७०

शेतमजुराच्या उत्पन्नाचा विचार केला तर यासंबंधात १९५६-५७ व १९६३-६४ अशी दोन वेळा पहाणी झाली आहे त्या पहाणीनुसार १९५६–५७ साली शेतमजुरांचे कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ४३७–४० तर १९६३–६४ साली ते रु. ६६०–१९ झाले आहे. १९७०–७१ साली पुन्हा पहाणी झाली. त्यात शेतमजूर पुरुषाचे उत्पन्न रु. ७६६–१० व स्त्रियांचे रु. ७२२–७० आहे असे आढळून आले. शेतमजुरांचे हे दारिद्रय काही आजचे नाही. भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेत ज्या दिवशी शेतमजूर श्रेणी निर्माण झाली तेव्हापासून ते समाजाच्या सर्वात खालचे पायरीवर खितपत आहेत असेच आढळून येते. इतक्या तुटपुंज्या वेतनात शेतमजूर आपले जीवन कसे कंठीत असतात हे पहाणे जरूर आहे कोणाच्याही दारिद्रयाची कल्पना जर त्याच्या खर्चावरून करावयाची असेल तर आपल्या एकूण खर्चापैकी किती भाग तो अन्नावर खर्च करतो यावरून ते लक्षात येते. माणसाच्या खर्चाचा जेवढा अधिक भाग केवळ अन्नावर खर्च होईल तेवढे त्याचे दारिद्रय जास्त असा अनुभव आहे. शेतमजूर आयोगाच्या पहाणीनुसार त्याच्या एकूण खर्चापैकी अन्नधान्यावर होणाऱ्या खर्चाचे प्रमाण महाराष्ट्रात ७३% आहे असे आढळून आले आहे.

## दारिद्रय हटवण्यासाठी

हे दारिद्रय नष्ट करावयाचे असेल तर शेतमजुराला उचित असे किमान वेतन मिळावयास हवे परंतु महाराष्ट्र शासनाने शेतमजुरांचे किमान वेतन ठरवताना त्याला फक्त २,००० कॅलरीची गरज आहे

असे मानले आहे. वास्तविक शेतमजुराचे काम हे कठीण कष्टाचे काम असून त्याला किमान २८०० कॅलरीची गरज आहे. शेतमजुरांच्या कुटुबात ४ युनिट आहे असे धरले तर त्याच्या कुटुंबाला दररोज किमान ११,२०० कॅलरीची गरज आहे असे दिसून येईल. पागे समितीने ८,००० कॅलरीची गरज आहे असे गृहीत धरून शेतमजुरांच्या कुटुंबाची रोजची गरज ६ किलो ज्वारीच्या किमती इतकी आहे असा निष्कर्ष काढला आहे पण वर नमूद केल्याप्रमाणे ती गरज ११,२०० कॅलरीची आहे हे लक्षात घेतल्यास पागे समितीच्या कल्पनेप्रमाणे शेतमजुरांच्या कुटुंबाची गरज ८.४ किलो ज्वारीच्या किमतीइतकी ठरेल. सर्व कॅलरीज ज्वारीत मोजणे हे चूक आहे कारण मनुष्याला ज्वारी किंवा गहू याप्रमाणे डाळी, तेल, साखर वगैरे वस्तूंची जी गरज असते ती लक्षात घेता कुटुंबाचा खर्च ज्वारीच्या किमतीपेक्षा निश्चित जास्त होईल. उत्तम ज्वारीची किंमत आज रु २ आहे. या हिशेबाने ८.४ किलो ज्वारीची किंमत रु. २२.६८ एवढी होते. यातच डाळी, तेल, साखर वगैरे वस्तूंना लागणाऱ्या जादा किमतीची भर घातली तर शेतमजूर कुटुंबांच्या १ दिवसाच्या खर्चासाठी कमीतकमी रु. २५ ची गरज आहे. हे कोणासही मान्य करावे लागेल. कुटुंबात दोन मिळवती माणसे आहेत असे जरी गृहीत धरले तरी एक व्यक्तीला रोज किमान रु. १२–५० वेतन मिळाले पाहिजे. हे वेतन सर्वात शेवटच्या परिमंडळाचे धरून शेतमजुराला जिराईत भागात रु. १२, आठमाही बागायती भागात रु. १५, व बारामाही बागायती भागामध्ये रु. १८ असे किमान वेतन मिळाले पाहिजे अशी आमची मागणी आहे. सरकारतर्फे शेतमजुरांच्या रहाणीचा निर्देशांक दरमहा प्रसिद्ध केला जातो. १९६०–६१ च्या जुलैमध्ये निर्देशांक धरल्यास जुलै १९८४ मध्ये तो ५१४ वर गेला आहे. शेतमजुरांच्या रहाणी निर्देशांकाच्या ५०० या संख्येशी वरील १२, १५ व १८ हे वेतनाचे दर जोडून निर्देशांकात होणाऱ्या वाढीप्रमाणे दर सहा महिन्यांनी किमान वेतनातही आपोआप वाढ करावी अशी आमची मागणी आहे

# हे पुरोगामी शासन ?

महाराष्ट्र शासन हे स्वत:ला पुरोगामी म्हणवते परंतु केंद्र सरकारने व देशातील अनेक राज्यांनी शेतमजुराच्या किमान-वेतनाचे जे दर निर्धारित केले आहेत ते आपल्यापेक्षा कितीतरी अधिक आहेत. केंद्र सरकारने गेल्याच वर्षी किमान वेतनाचे दर सुधारून ते निरनिराळ्या विभागाप्रमाणे रु ७–५० ते रुपये ११–२५ प्रमाणे निश्चित केले आहेत. आंध्र प्रदेशमध्ये ७–९–१९८३ रोजी निरनिराळ्या विभागाप्रमाणे रु. ७ पासून रु. १८ पर्यंत वेतनाचे दर निश्चित केले आहेत. बिहारमध्ये रु ८–५० तर गुजराथमध्ये रु. ९ दर १९८२ साली निश्चित केले आहेत. हरयाणामध्ये १९८२ साली रु. १४ चा दर निश्चित करून वाढत्या महागाई प्रमाणे त्यात १९८३ साली रु. ०–९२ ची वाढ केली. पश्चिम बंगालमध्ये किमान–वेतनाचा दर महागाईचे निर्देशांकाशी जोडून १९८२ साली रु. १२–०१ ठरविला होता. पंजाबमध्ये १९८२ साली रु १४ चा दर ठरविला असून १–७–८३ पासून वाढत्या महागाईमुळे तो रु. १५–३२ केला आहे. हे सर्व दर महाराष्ट्राच्या रु. ६ ते रु. १० च्या पेक्षा कितीतरी जास्त आहेत. या सर्व गोष्टी लक्षात घेता आणि वाढती महागाई जमेस धरता आम्ही वर सुचविलेले रु. १२, १५ व १८ दर अवास्तव आहेत असे कोणालाही म्हणता येणार नाही परंतु केवळ आकडेवारी मांडून हे दर आपल्या पदरात पडणार नाहीत. त्यासाठी व तीव्र अशा संघर्षाची तयारी केली पाहिजे.

महाराष्ट्र शेतमजुरांपैकी किमान १७% मजूर सालदारी किंवा महिनादारी पद्धतीने काम करतात. पागे समितीने त्यांच्या कामाचे तास व स्प्रेड ओव्हर ठरवून दिलेला असला तरी त्याच्यापैकी अनेकाना १४–१५ तास काम करावे लागते. अशा वेळी त्यांचे वेतन कसे ठरवावे हा एक प्रश्न उपस्थित होतो पागे समितीने ज्या विभागात रोजंदारीचे वेतन रु ६ ठरविले. तेथे मासिक वेतन रु. २०० व साल-

दारास २४०० वेतन ठरविले आहे. म्हणजे महिन्याला रोजच्या वेतनानें गुणून त्यात फक्त रु. २० वाढ व सालदारास रु. २०० वाढ केली आहे. आमचे मते या मजुरांच्या कामाची बांधिलकी तास व कष्ट लक्षात घेता, ही सुमारे १० टक्के पडणारी वाढ फार अपुरी आहे. मासिक व सालदारी पद्धतीने काम करणाऱ्या मजुरांच्या मजुरीत किमान २५ टक्के तरी वाढ झाली पाहिजे. म्हणजे शेवटच्या झोनमध्ये महिनेदारी पद्धतीने काम करणाऱ्या किमान रु. ४५० व सालदारास किमान रु. ५००० मिळाले पाहिजेत आणि दुसऱ्या व पहिल्या झोनमध्येही याच हिशेबाचे वार्षिक व मासिक वेतनात वाढ झाली पाहिजे. व सर्व वेतनांचाही रहाणीच्या निर्देशांकात होणाऱ्या वाढीप्रमाणे फेरविचार झाला पाहिजे.

## अंगावरील कामाचे दर

शेतमजुरांचे किमान वेतन निश्चित झाल्यावर व कायद्यामुळे येणाऱ्या बंधनातून सुटका व्हावी याकरिता अंगावर व उक्त्या पद्धतीने देण्यात येणाऱ्या कामाच्या मध्ये वाढ झाली आहे, कामाचे तास, ओव्हर टाईम, आठवड्याची रजा, हजेरीपत्रक यातून सुटका घेऊन व कमी मजुरीचे दर देऊन मजुरांची पिळवणूक करण्यात येत. थोड्या अधिक पैशाच्या आशेने वाटेल तितका वेळ मजूर राबतात, शक्ती खर्ची घालतात. अकाली म्हातारे होतात. यात मजुराला मोकळीक व स्वातंत्र्य असत, असे त्याबद्दल बोलून समर्थन केले जाते, अंगावरील व उक्त्या कामातील निरनिराळ्या कामाचे दर निश्चित करण्याची आवश्यकता आहे. या कामातील मजूर व मालकांचे झगडे निर्माण होऊ लागले आहेत. त्यासाठी नॉर्म्सस ठरविणे जरूरीचे झाले आहे. सात तासांच्या कामाकरिता त्याच प्रकारच्या कामाचे जे किमान वेतन ठरविण्यात आले असेल त्यापेक्षा सर्वसाधारण पद्धतीने काम करणाऱ्या मजुरांना तितके तसे किमान वेतन मिळाले पाहिजे अशी हमी देणारा दंडक घालून दिला पाहिजे नाहीतर किमान वेतनालाच अर्थ राहणार नाही.

## पारंपारिक हक्कांचा आग्रह

शेतमजुरांचे किमान वेतन निश्चित झाल्यानंतर ते मिळविण्यासाठी त्यांचे संघटीत प्रयत्न सुरू होतात त्यावेळी त्यात अडथळे आणण्यासाठी शेतमजुरांना व सर्वसामान्यांना जे हक्क परंपरेने मिळालेले असतात त्यावर आळा घालण्यात येतो. जनावरासाठी बांधावरून वैरण, चारा गोळा करणे, विहीरीचे पाणी वापरणे, कापणी पूर्ण झाल्यावर सरवा, वेचून त्यातील काही भाग घेऊन येणें, भांगलणीतून गोळा केलेला पाला व गवत आणणे इ. गोष्टी परंपरागत हक्क म्हणून प्रस्थापित झालेल्या आहेत. किमान वेतन ठरल्यानंतर परंपरागत हक्कांना बाधा येणार नाही अशी कायदेशीर तरतूद करण्यात आली पाहिजे.

## घरांचा प्रश्न

शेतमजुरांच्या राहत्या घरांचा प्रश्नही या परंपरागत हक्कांसारखाच आणि महत्त्वाचा आहे. बऱ्याच वेळा शेतमजूर विशेषतः सालदार व महिनेदार हे शेतमालकांच्या जागेत अथवा शेतातच वस्ती करून राहतात. शेतमजुराबरोबरच मालकांच्या ते सोईचे असते. तरीही मजूर संघटीत झाला की, त्या जागेवरून हुसकावून लावण्याचा उद्योग मालकमंडळी करतात. तेव्हा शेतमजुरांसाठी घरे देण्याची आणि आज ते ज्या ठिकाणी राहतात त्या घरांवर व आजूबाजूचे काही जागेवर निदान अन्य सोईची जागा व निवारा शासन उपलब्ध करून देईपर्यंत अबाधित अधिकार राहाण्याची कायदेशीर तरतूद करण्यात आली पाहिजे. किमान वेतन व कायद्याने देण्यात आलेल्या हक्कांची अंमलबजावणी यासाठी चालविलेल्या प्रयत्नांबद्दल जागेस व घरास मुकण्याचा प्रसंग कोणावरही येता कामा नये किमान वेतन कायदा, त्यातील तरतूदी व वेतन याची कदर करण्याची जबाबदारी सरकारने स्वीकारली पाहिजे.

सालदार व बारा महिने काम करणारे महिनेदार या पद्धतीच्या कामगारांना आज कोणत्याही प्रकारची सुरक्षितता व भविष्य निर्वाहनिधी वगैरे भविष्य काळासाठी काही तरतूद नाही तसेच अचानक आजारी पडल्यास औषधोपचाराची तरतूद नाही म्हणून समिती एकमताने अशी शिफारश करीत आहे की, अश पद्धतीने जे कामगार शेतमालकाकडे काम करतात त्या शेतमालकांवर अशा कामगारांसाठी ' जनता विमा पॉलीसी ' शेतमालकांच्या खर्चाने देण्याची सक्ती करावी. तिचा वार्षिक हप्ता १२ रु. आहे व विम्याची रक्कम १० हजार रुपये आहे. त्यामुळे शेतमजूरांना अपघात किंवा अकाली मृत्यू आल्यास त्याप्रमाणे आर्थिक फायदा होईल. विम्याचे राष्ट्रीयकरण झालेले असल्याने हे पैसे सुरक्षित राहतील व अशा कर्मचाऱ्यांना दिलासा मिळेल.

## किमान वेतन अंमलबजावणीसाठी

आतापर्यन्त दोन वेळा शेतमजुरांचे किमान वेतन निश्चित करण्यात आले म्हणजे १९७४ साली प्रथम किमान वेतन निश्चित करण्यात आले आणि १९७८ साली त्यामध्ये सुधारणा करण्यात आली. परंतु निश्चित केलेल्या किमान वेतनाची अंमलबजावणी करण्याचे दृष्टीने कोणतीही बंधने अथवा उपाययोजना सुचविण्यात आलेली नाही. किमान वेतन कायद्यामध्ये हजेरीपत्रक व पगारपत्रक ठेवण्याचे बंधन आहे परंतु त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे होईल अशा प्रकारची शिफारस करण्याऐवजी हे बंधन शिथील करून अगर पगार मिळाल्याची पावती दिली की संपले अशी शिफारस तिसऱ्या पागे समितीने केली आहे. समितीची ही शिफारस म्हणजे घड्याळाचे काटे उलटे फिरविण्याचाच प्रकार आहे. सधन शेतकरी व बागाईतदारांमुळे कोणतेही बंधन असता कामा नये या विचाराचा तिसऱ्या पागे समितीवर केवढा दबाव आहे याचे हे द्योतकच आहे. एका बाजूने कामगार असला तरी त्यास भविष्य निर्वाह निधी योजना व सेवा निवृत्ती योजना लागू करणार असल्याची घोषणा सरकार करत

असते. परंतु हजेरी पत्रक अथवा पगार पत्रक ठेवायचे नाही. मग भविष्य निर्वाह निधी योजना व सेवानिवृत्ती वेतन योजना यांचा लाभ मागण्याचा प्रश्नच येत नाही. किमान वेतनाची अंमलबजावणी न करणे हा शिक्षापात्र गुन्हा ठरविण्यात यावा अशी मागणी शेत-मजुरांच्या सर्व संघटनांकडून होत आहे. तर तिसरी पागे समिती अंमलबजावणीचे तुटपुंजे बंधनही शिथील करीत आहे. या सर्व बाबींचा विचार करता आम्ही खालील सूचना करीत आहोत

१) किमान वेतन कायद्यातील आता आहेत ती सर्व बंधने उदा. हजेरीपत्रक व पगारपत्रक ठेवणे वगैरे बंधने तशीच पुढे चालू ठेवावीत त्याच बरोबर मजुरांना किमान वेतन कार्ड देणे हेही आवश्यक आहे.

२) किमान वेतनाची अंमलबजावणी न करणे हा दखलपात्र गुन्हा ठरविण्यात यावा.

३) सरकारी, सहकारी अथवा इतर कोणत्याही स्वायत्त संस्थांनी शेतमालकास पतपुरवठा व इतर सहाय्य करण्यापूर्वी त्याने शेतमजुरांच्या किमान वेतनांची अंमलबजावणी केली असल्याचा योग्य त्या अधिकाऱ्याचा दाखला हजर करावा.

४) अंमलबजावणीकरिता स्थानिक पातळीवर अथवा तालुका पातळीवर शासन, शेतमालक व शेतमजूर संघटनांचे प्रतिनिधी यांची त्रिपक्ष समिती स्थापन करण्यात यावी.

५) शेतमजूर संघटनांचे प्रतिनिधींना किमान वेतन अंमल-बजावणी करण्याबाबत निरीक्षण करण्याचा वा त्यासंबंधी अहवाल सादर करण्याचा अधिकार असावा.

शेतमजुरांचे काम, नोकरीविषयक स्थिती, भविष्यकाळाची तरतूद असलेले विधेयक मांडले जाणार, त्या संबंधीच्या तरतूदी असणारा कायदा लवकरच केला जाणार अशा घोषणा वेळोवेळी लोकसभेत करण्यात आल्या परंतु त्यासंबंधीचे विधेयक अद्याप मांडले गेले नाही, तेथे कायदा होण्याची बात दूरच. त्यासंबंधी कायदा करण्याचे

राज्यालाही अधिकार आहेत. केरळ सरकारने यासंबंधी मागे एक कायदाही केला आहे. राज्य सरकारने सर्वंकष कायदा करण्याचे पाऊल टाकावे.

## राहाण्याच्या जागेचा हक्क

शेतमजुरांना राहण्यासाठी व जनावरासाठी पुरेशी जागा व घरे बांधून देणे व त्यासाठी सहाय्य देणे हा प्रश्न अतिशय निकडीचा बनला आहे. खेड्यातूनही झोपड्या निर्माण झाल्याचे दृश्य पहावयास मिळते. अत्यंत तोकड्या जागेत जनावरे, माणसे कशी तरी कोंबल्या-सारखी राहतात असा अनुभव येतो अशा वेळी गावठाणाचा विस्तार करून अगर गावापासून दूर नसलेल्या घरासाठी शेतमजुरांना मोफत जागा, घरे बांधण्यास निम्मे बिनव्याजी आर्थिक कर्ज, सहाय्य देण्यात यावे, अशा जागेवर रस्ते, पिण्याच्या पाण्याची, दिवा-बत्तीची सोय इ. आवश्यक सोयी करण्यात याव्यात.

## रोजगार हमी कामगार

शेतमजुरांच्या इतकाच रोजगार हमी कामगारांचा प्रश्न मह-त्वाचा आहे. महाराष्ट्रात गेली १० वर्षे ही रोजगार हमी योजना चालु आहे व या कामावर सुमारे १० लाख लोक काम करतात. परंतु कायद्यात जरी 'हमी' या शब्दाचा उल्लेख असला तरी आज हजारो लोकांना मागितल्याबरोबर काम मिळत नाही. कामासाठी दोन-दोन महिने वाट पहावी लागते. तसेच अनेक लोकांना ५ किंवा १० किलो-मीटरपेक्षा अधिक अंतरावर कामासाठी पाठवूनही कायद्यात तरतूद केल्याप्रमाणे मजुरांना कँपची व्यवस्था किंवा जाण्या-येण्याची सोय या सवलती मिळत नाहीत. मागेल त्याला काम व कामावर अनेक सवलती असा महाराष्ट्र सरकारचा दावा असला तरी शासनाची जी यंत्रणा ही योजना राबवते तिच्यातल्या बऱ्याच अधिकाऱ्यांना रोजगार

हमी म्हणजे एक पीडा वाटते व नानाप्रकारची कारणे सांगून मागेल त्याला जरूर त्या वेळी काम मिळवून देण्याचे बाबतीत ते टाळाटाळ करतात असा अनुभव आहे. उलट कायद्याप्रमाणे मजुरांना काम मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना कायद्याचा बडगा दाखविण्यात येतो व त्यांच्यावर सरकारी कामात व्यत्यय आणला अशासारखे आक्षेप काढून त्यांना तुरुंगातही डांबण्यात येते. सातारा जिल्ह्यातील म्हसवड विभाग, पुणे जिल्ह्यातील शिरूर व पुरंदर तालुके, नगर जिल्ह्यातील कोपरगाव, श्रीरामपूर, मराठवाड्यातील परांडा, सोलापूर जिल्ह्यातील करमाळा, चंद्रपूर जिल्ह्यातील त्रिपूर व गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी इत्यादी अनेक ठिकाणांहून आमच्याकडे या संदर्भात तक्रारी आल्या आहेत. काम पुरवता आले नाही म्हणून रोजगार हमीचा प्रश्न हा जर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून हाताळण्यास अधिकाऱ्यांनी सुरुवात केली तर या योजनेमागचा मूळ हेतूच नष्ट होईल. काम मागणाऱ्यांना मात्र कायद्याचा हिसका दाखवायचा व काम पुरविण्याची ज्यांच्यावर कायदेशीर जबाबदारी आहे त्यांनी जर ती जबाबदारी पार पाडली नाही तर त्यांच्याविरूद्ध मात्र कोणीही कारवाई करावयाची नाही ही सरकारची नीती रोजगार हमी कायद्याच्या तत्त्वाशी पूर्णपणे विसंगत आहे.

आज महाराष्ट्रात हजारो लोकांना ते काम मागण्यास पात्र असूनही व त्यांनी योग्य प्रकारे काम मागूनही काम मिळत नाही. शासनाने या वर्षी काम मागणारांची पुन्हा नोंद करण्याचे ठरविले आहे, परंतु नोंदणी अधिकारी जागेवर भटत नाहीत. भटले तर त्यांच्याजवळ अर्जाचे नमुने उपलब्ध नसतात. नोंदणी अर्ज भरल्यानंतर कार्ड मिळण्यास २–२ महिने वेळ लागतो. यावरून शासनाची ही योजना अमलात आणण्यासंबंधीची वृत्ती किती बेफिकीरीची आहे हेच दिसून येते. वस्तुतः प्रत्येक जिल्ह्यात जितक्या मजुरांची नोंद झाली आहे तितक्या मजुरांना पुरेल एवढ्या कामांचे आराखडे व

खर्चाचे अंदाज तयार करून तशी नील पत्रिका प्रसिद्ध करण्याची जबाबदारी प्रत्येक कलेक्टरवर असते. अशा नील प्रत्रिका जर व्यवस्थित तयार केल्या तर काम न मिळण्याचे संदर्भात आज येणाऱ्या अनेक अडचणी दूर होतील. नील प्रत्रिका तयार केल्यानंतर मजुरांच्या मागणीप्रमाणे व कलेक्टरच्या सूचनेनुसार निरनिराळ्या खात्याने कार्य करायची असतात, परंतु कलेक्टरने सूचना देऊनही अनेक ठिकाणी खात्याचे अधिकारी निरनिराळी कारणे सांगून काम सुरू करण्याबाबतीत टाळाटाळी करतात या संदर्भात मृदसंधारण खात्याचा विशेष उल्लेख करणे आवश्यक आहे. या खात्यामार्फत वारंवार सूचना देऊनही, प्रत्यक्ष भेटूनही कामे सुरू होत नाहीत असे अनेक ठिकाणचे अनुभव आहेत. काही ठिकाणी या खात्याचे कनिष्ठ अधिकारी काम सुरू केल्याचा रिपोर्ट करतात. पण प्रत्यक्ष कामावर हजर रहात नाहीत त्यामुळे गरजू मजुरांना तहशीलदाराने तेथे पाठविले तर त्यांना कामच मिळत नाही. कधी आराखडे तयार नाहीत, कधी खात्याची मंजुरी मिळाली नाही, कधी सर्व्हे करण्याकरिता स्टाफ नाही अशी अनेक कारणे सांगून कामे सुरू करण्याचे टाळण्यात येते. मजुरांना मात्र कामाची आवश्यकता असते व काम मिळाले नाही तर ते निदर्शने करतात. वस्तुतः या संदर्भात काम न सुरू करण्याच्या बाबतीत कोणते अधिकारी जबाबदार आहेत व त्यांचा काय दोष आहे याची चौकशी झाली पाहिजे व दोषी अधिकाऱ्यांच्या विरूद्ध कडक कारवाई झाली पाहिजे. रोजगार हमी योजना राबवणारी आजची यंत्रणा अत्यंत भोंगळ, गैरशिस्त व बेजबाबदार झाली आहे. बऱ्याच ठिकाणी कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नाही अशी अवस्था आहे. सुसुत्रीकरण करण्याचा फार मोठा अभाव आहे. तेव्हा ही योजना कार्यक्षमतेने राबवायची असेल व मागेल त्याला काम हा उद्देश सफल करावयाचा असेल तर या यंत्रणेची फेररचना झाली पाहिजे. कामचुकार अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याची तरतूद असली पाहिजे व चांगले काम करणाऱ्या

अधिकाऱ्यांना बढती आणि प्रोत्साहन देण्याची व्यवस्था झाली पाहिजे.

## देखरेख समित्या

रोजगार हमीच्या कामावर देखरेख करण्यासाठी तालुका व जिल्हा पातळीवर ज्या कमिट्या नियुक्त केल्या आहेत त्यावर मजुरांचे व त्यांच्या रजिस्टर्ड संघटनांचे प्रतिनिधी घेण्याची कायद्यात तरतूद आहे. परंतु वारंवार मागणी करूनही बहुसंख्य ठिकाणी असे प्रतिनिधी घेण्याचे शासनाने टाळले. अशा प्रतिनिधींची जर तातडतोब नियुक्ती झाली आणि वर सुचवल्याप्रमाणे यंत्रणेत फेररचना झाली तरच ही योजना टिकून राहील. अन्यथा ती धोक्यात येण्याचा संभव आहे आजच नोकरशाहीतील काही अधिकारी व बडे बागाईतदार ही योजना संपुष्टात आणण्याच्या खटपटीला लागली आहेत. त्यासाठी रोजगार हमीच्या होणाऱ्या भ्रष्टाचाराचा गवगवा करून योजना मोडीत काढण्याच्या ते विचारात आहेत. भ्रष्टाचाराचा कोणीही पाठपुरावा करणार नाही. आपल्यापैकी अनेक कार्यकर्त्यांनी रोजगार हमी भ्रष्टाचाराची प्रकरणे उजेडात आणली आहेत. काही सरकारी अधिकाऱ्यांनी देखील हे भ्रष्टाचार उघडकीस आणून संबधीत अधिकाऱ्यांविरूद्ध कारवाई सुरू केली होती. पण अशा अधिकाऱ्यांच्या बदल्या करून शासनाने भ्रष्ट लोकांना पाठिशी घातले रोजगार हमीवरील भ्रष्टाचार कमी करायचा असेल तर निरनिराळ्या पातळीवरील कमिट्यांवर मजुऱ्यांच्या प्रतिनिधींची नियुक्ती उपयुक्त ठरेल. लोकशाही म्हणजे नुसती ५ वर्षांनी निवडणूक नव्हे तर प्रत्येक कामात भाग घेणाऱ्या लोकांना व विशेषतः कष्टकऱ्यांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेतले पाहिजे. रोजगार हमीचे संदर्भात तर आज या गोष्टींची विशेष गरज आहे.

रोजगार हमी योजना आज एका कठीण अवस्थेतून जात आहे. अशावेळी ती वाचविण्यासाठी, तिच्यात सुधारणा करण्यासाठी व तिचे उद्दिष्ट पदरात पाडून घेण्यासाठी आपण सर्वांनी कंबर कसून व एकजुटीने झगडण्याची तयारी केली पाहिजे.

शेतमजुरांच्या समस्या व रोजगार हमीची परिस्थिती या दोन गोष्टींचा येथपर्यंत विचार केला. या शिवाय दलितांच्या व आदिवासींच्या जमिनी अतिक्रमण केलेल्या जमिनी, वेठबिगारीचा प्रश्न अशा अनेक महत्त्वाच्या प्रश्नांचा विचार आपण या परिषदेत करावयाचा आहे. वास्तविक हे सर्व प्रश्न एकमेकांशी निगडीत आहेत. शेतमजुराला पुरेसे वेतन मिळाले नाही म्हणजे तो कर्जबाजारी होतो. व कर्ज फेडता न आल्यामुळे तो वेठबिगार बनतो. भूमिहीनांना उपजिविकेचे साधन न मिळाल्यामुळे ते जंगलात किंवा अन्य सरकारी जमिनीवर केवळ पोट भरण्यासाठी अतिक्रमण करतात. ते थांबवावयचे असेल तर रोजगाराची हमी प्रत्यक्षात आली पाहिजे व प्रत्येक रोजगार करणाऱ्याला पुरेसे वेतन मिळाले पाहिजे. परंतु आज शेतमजूर, रोजगार हमी कामगार, आदिवासी, दलित, अल्प-भूधारक व वेठबिगार हे पुरेसे जागृत नाही. त्यांची संघटना अत्यंत फुटकळ व कमजोर आहे म्हणून त्यांचेवरील अन्यायाची दाद कोणी घेत नाही. खरे म्हणजे समाजातील एकूण कष्टकऱ्यांपैकी या लोकांची संख्या निम्याहून अधिक आहे. पण संख्येप्रमाणे आपली शक्ती नाही म्हणून आपणास अन्यायात, दारिद्रयांत व उपासमारीत खितपत पडावे लागले. या सर्वांवर मात करण्यासाठी हे समन्वय समितीचे व्यासपीठ आपण उभे केले आहे. महाराष्ट्रातील शेतमजुरात, रोजगार हमी कामगारात वेठबिगारात काम करणाऱ्या अनेक लहान-मोठ्या संघटनांना आपणव या समन्वय समितीत एकत्र आणले आहे. ही एकी जास्त बळकट आणि व्यापक करण्याचा आणि तिचे आधारे आपल्या मागण्यांच्या पूर्ततेसाठी व ही अन्याय्य समाजव्यवस्था बदलण्यासाठी सतत संघर्ष करण्याचा निर्धार आपण या परिषदेत करू या. ●●●

## रोजगार हमी कामावरील सर्वसाधारण प्रतिदिनी मजुरांची उपस्थिती

| वर्ष | हजेरी | वर्ष | हजेरी |
|---|---|---|---|
| १९७५–७६ | ३,३०,६३७ | १९७६–७७ | ४,५५,८१८ |
| १९७७–७८ | ३,९०,८५७ | १९७८–७९ | ५,४५,१५९ |
| १९७९–८० | ६,८४,५४३ | १९८०–८१ | ७,५०,२९४ |
| १९८१–८२ | ५,२०,२९४ | १९८२–८३ | ४,६८,३१९ |
| १९८३–८४ | ५,३८,४२२ | | |

# महाराष्ट्रातील लोकसंख्या व कामकरी–शेतमजूर संख्या [१९८१]

| जिल्हा | लोकसंख्या एकूण (हजारात) | कामकरी एकूण (हजारात) | शेतमजूर एकूण (हजारात) | शेतमजूर प्रमाण शेकडा |
|---|---|---|---|---|
| बृहन-मुंबई | ८,२२७ | २,८६४ | ४ | ०.१६ |
| ठाणे | ३,३३९ | १,२३७ | १६७ | १३.१० |
| कुलाबा | १,४८३ | ५५६ | ७८ | १४.१८ |
| रत्नागिरी | २,१०९ | ७१८ | ५९ | ८.२९ |
| नासिक | २,९८५ | १,२७० | ३८१ | ३०.०३ |
| धुळे | २,०५१ | ७८४ | ३२६ | ४१.६४ |
| जळगाव | २,६१८ | १,०४० | ४३४ | ४१.८० |
| अहमदनगर | २,७११ | १,१३८ | ३२१ | २८,२४ |
| पुणे | ४,१६२ | १,४२८ | १८८ | १३.२२ |
| सातारा | २,४१ | ७०६ | १३९ | १९.७८ |
| सांगली | १,८२६ | ६२२ | १४० | २२.४९ |
| सोलापूर | २,६०७ | ९८३ | २९१ | २९.६५ |
| कोल्हापूर | २,४९९ | ९१७ | १५२ | १६.५९ |
| औरंगाबाद | २,४४० | ९२१ | २८६ | ३१.०९ |
| परभणी | १,८२६ | ८०५ | ३२० | ३९.८४ |
| बीड | १,४८४ | ६०० | १८७ | ३१.१४ |
| नांदेड | १,७४७ | ७११ | २४५ | ४४.५२ |
| उस्मानाबाद | २,२२७ | ८६२ | ३२६ | ३७.९० |
| बुलढाणा | १,५०६ | ७०६ | ३०९ | ४३.८० |
| अकोला | १,८२५ | ७७७ | ४९४ | ५०.७६ |
| अमरावती | १,८५८ | ७५१ | ३९५ | ५२.५७ |
| यवतमाळ | १,७३५ | ८०२ | ४२८ | ५३.४० |
| वर्धा | ९२६ | ३९८ | १९१ | ४७.९९ |
| नागपूर | २,५८२ | ९१३ | २४२ | २६.५६ |
| भंडारा | १,८३६ | ८३९ | २२७ | २७.१६ |
| चंद्रपूर | २,०५४ | ८८० | २६१ | २९.६८ |
| महाराष्ट्र | ६२,७१५ | २४,२७७ | ६५ लाख | २६.०९ |

**महाराष्ट्रातील अनुसूचित जाती जमाती व बौद्धधर्मीय यामधील कामकऱ्या मध्ये शेकमजुरांचे शेकडा प्रमाण (१९७१)**

| जिल्हा | अनु. जाती शेतमजूर प्रमाण | बौद्धधर्मीय शेतमजूर प्रमाण | अनु जमाती शेतमजूर प्रमाण | अनु. जाती+ बौद्ध+अनु. जमाती शेत-मजूर प्रमाण |
|---|---|---|---|---|
| बृहन्मुंबई | १.२५ | १.९३ | १०.९५ | १४.१३ |
| ठाणे | १.२६ | २.०० | ७१.७२ | ७४.९८ |
| कुलाबा | १.१५ | ४.१६ | ३९.७६ | ४५.०७ |
| रत्नागिरी | ७.४७ | १९.२१ | १.९२ | २८.६० |
| नासिक | ५.४२ | ६.८२ | ५१.९५ | ६४.१९ |
| धुळे | ४.७६ | २.१३ | ५५.२३ | ६२.१२ |
| जळगाव | ५.८० | ६.५२ | १३.६१ | २५.९३ |
| अहमदनगर | १७.७२ | ४.८६ | ११.७९ | ३४.३७ |
| पुणे | १०.२८ | ९.४३ | ७.८६ | २७.५७ |
| सातारा | १३.६० | १४.६० | ०.४८ | २८.६८ |
| सांगली | २४.७४ | ७.४६ | ०.३८ | ३२.५८ |
| सोलापूर | ३२.२२ | ३.९९ | ०.६२ | ३६.८३ |
| कोल्हापूर | ३४.०७ | २.३६ | ०.२१ | ३६.६४ |
| औरंगाबाद | ११.३७ | १६.८६ | ४.७६ | ३२.९९ |
| परभणी | ११.७३ | २३.९३ | ४.११ | ३९.७७ |
| बीड | ३१.८४ | ६.८५ | ०.७५ | ३९.४४ |
| नांदेड | २२.४३ | २३.८२ | ७.२० | ५३.४५ |
| उस्मानाबाद | ३७.५१ | १०.१० | ०.२९ | ४७.९० |
| बुलढाणा | ८.०२ | १८.१९ | — | २६.२१ |
| अकोला | ७.२१ | २४.४३ | — | ३१.६४ |
| अमरावती | ५.४१ | १७.०९ | ३.८१ | २६.३१ |
| यवतमाळ | ४.९१ | ११.५३ | २३.२६ | ३९.७० |
| वर्धा | ३.१९ | १५.१५ | — | १८.३४ |
| नागपूर | ३.९१ | १३.७६ | — | १८.३४ |
| भंडारा | २.८१ | ६.९७ | — | ९.७८ |
| चंद्रपूर | ४.९९ | ११.११ | १५.७१ | २१.८१ |
| महाराष्ट्र राज्य | ११.८६ | ११.८६ | १३.१२ | ३६.८४ |

## ● कॉ. संतराम पाटील यांचे समारोपाचे भाषण ●

परिषदेचा समारोप करताना निमंत्रक कॉ. संतराम पाटील आपल्या भाषणात म्हणाले की–

महाराष्ट्रातील छोटचा-मोठचा संघटनानी एकत्र येऊन एक-जुटीने भरविलेली ही पहिलीच परिषद आहे. ही मोठी वैशिष्टचपूर्ण घटना आहे.

महाराष्ट्राच्या जीवनात या घटनेला महत्त्व आहे. कारण १९८१ च्या शिरगणती प्रमाणे शेतमजूर व निमशेतमजूर असलेला गरीब शेतकरी आदि ग्रामीण श्रमिकांची संख्या एक कोटीवर आहे. महाराष्ट्रात देशातील सर्वाधिक नागरीकरणाचे प्रमाण आहे. काम-गारांची संख्या ३०% आहे. तेंव्हा कामगारासह आपली संख्या ५०% च्या वर आहे.

आपण आता पर्यंत असंघटित होतो. आता आपल्यातील संघटना, जागृती, धिटाई, झगडे करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. झगडेही वाढत आहेत

आज भरलेल्या या पहिल्याच परिषदेचे ठिकाण बदलले, तारखा बदलल्या, इंदिरा गांधींच्या हत्येनंतर १५ नोव्हेंबर ऐवजी ती आज आपण १२ डिसेंबरला घेत आहोत. १५ नोव्हेंबरला राज्याच्या निरनिराळ्या भागातून सुमारे १०० एक प्रतिनिधी येऊनही गेले. अशा बऱ्याच परिषदेच्या प्रयत्नांवर परिणाम करणाऱ्या अड-थळ्याच्या बाबी आल्या, तरीही आज इतक्या मोठ्या प्रचंड संख्येने आपण जमत आहोत. यातून मी केलेल्या विधानाची प्रचिती येते. अजूनही मोठ्या प्रमाणावर शेतमजूर, सालगडी, महिनेदार संघटित नसला तरी संघटित होण्याची, जूट करण्याची, लढे देण्याची क्रिया वाढत आहे.

आपल्या सध्याच्या जीवनात सुधारणा झाली पाहिजे ही भावना व्यापक व सार्वत्रिक आहे. त्याचेच दर्शन या परिषदेतून व्यक्त झाले आहे. हजारो रुपये खर्च करून नगर जिल्ह्याच्या बाहेरून तीन हजार पर्यंत राज्याच्या सर्व भागातून प्रतिनिधी आले व तेही निवडणूकीच्या धामधुमीच्या काळात. या वरून मी म्हणतो त्याची सत्यता पटावयास हरकत नाही.

येथून तुम्ही परत गेल्यानंतर या चळवळीला जे महान स्वरूप येणार आहे त्याबद्दल विश्वास बाळगण्या जोगी स्थिती आहे. सर्वांनी या समजाने काम केल्यास त्याला गती व व्याप्ती येणार आहे. मात्र त्या साठी संघटना व पक्षभेद आड येऊ न देता सर्वांनी कार्य केले तर त्याला शेतमजूर, रोजगार हमी कामगारांची साथ मिळेल व ते आपल्या जीवनात निश्चितपणे बदल घडवून आणण्यास समर्थ बनतील.

सरकार विरूद्ध आपला झगडा आहे व तो चालूच रहाणार आहे. या झगड्यातून आपण सरकारकडून किमान वेतन ठरवून, वाढवून घेतले व अनेक इतर सवलतीही प्राप्त करून घेतल्या. १९७१–७२ च्या काळात प्रचंड आंदोलन करून रोजगाराचा, स्त्री-पुरूषांना समान मजूरीचा हक्क कमावला. रोजगार हमी कायद्या-प्रमाणे काम व दाम देण्यासाठी आपण सरकारी यंत्रणेशी सतत झगडत आहोत. समन्वय समितीच्या स्थापनेनंतर केलेल्या झगड्यातून आपण आपल्या सवलतीत भर टाकली आहे. केवळ सरकारशी चआपला झगडा नाही तर गावोगावी राज्यकर्ता बनलेल्या धनदांडग्या सधन शेतकरी थरांशीसुद्धा रोजगार हमीसाठी तसेच किमान वेतन कायद्याची अंमलबजावणी व किमान वेतन वाढ, रहाण्यासाठी जागा, हस्तांतरीत जमिनी परत मिळवणे, वेठबिगारांची मुक्तता, अन्याय अत्याचाराचा बंदोबस्त या साठी संघटीत होऊन लढे दिले पाहिजेत. तरच आपण केलेल्या मागण्या व आपल्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आवश्यक असलेले सामर्थ्य प्राप्त होऊन सरकारला आपल्या मागण्यांचा

विचार करावा लागेल. त्याने तसा तो तातडीने न केल्यास झुंजही देण्याची तयारी होईल.

या परिषदेने ५ फेब्रुवारी ८५ रोजी महाराष्ट्रभर जमेल त्या ठिकाणी संपासह, सभा, मार्चे, निदर्शने मागणी दिन यशस्वी करण्याचा व त्या द्वारे जूट बळकट करण्याचा निर्णय घेतला आहे. तो कधीही नव्हे या रितीने व्यवहारात आणाल व त्यात लक्षावधी लोक भाग घेतील या बद्दल मला खात्री वाटते. मात्र त्या साठी समन्वय समितीमध्ये एकत्र आलेल्या संघटनांनी जास्तीत जास्त एकोप्याने, एकजुटीने व एकत्रितरित्या शेतमजूर व रोजगार हमी कामगारांना संघटीत करण्याचे व लढे लढविण्याचे धोरण घेतले व अमलात आणले तर ५ फेब्रुवारी महाराष्ट्रात अपूर्व रितीने साजरा होईल व नवे इतिहासाचे पान लिहीण्यास सुरवात झाली असा त्याला अर्थ होईल.

५ फेब्रुवारीच्या निदर्शनातून लक्षावधींचा सहभाग असलेले आंदोलन उभे रहावयाचे असेल तर जात, धर्म, पक्ष व लिंग भेदाचा विचार सोडून, फाटाफूट करण्याच्या, आपसात तंटे बखेडे माजविण्याच्या प्रयत्नाला खो देण्याची कुवत प्राप्त व्हावयाची असेल तर मजूर म्हणून संघटीत होऊन व पक्ष कोणताही असला तरी मजुराचे राजकारण करणारे लढे देऊ शकला तर महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय जीवनावर आपली छाप निर्माण होईल. वर्ग म्हणून अशी प्रभावी राजकीय शक्ती महाराष्ट्रात उभी करण्याचे काम आजपासून सुरू करा. कामगार वर्गाची संख्या वाढली आहे. शेतमजुरांना मदत करण्याची ते भूमिका घेत आहेत. याचा अनुभव आपल्याला आलेला आहे. यामुळे आपला विजय निश्चित आहे.

● ● ●

# शेतमजूर व रोजगार हमी कामगार समन्वय समितीत सहभागी असलेल्या संघटना.

१. शेतकरी शेतमजूर पंचायत (महाराष्ट्र)
   ५४, बुधवार पेठ, काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मी रोड, पुणे ४११ ००२.

२. म रा. शेतमजूर परिषद
   "श्रमिक", १२८९ सी, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर ४१६००२.

३. श्रमिक संघटना, शहादे जि. धुळे.

४. भूमिसेना. मनोर, ता. पालघर, जि. ठाणे.

५. म. रा. शेतमजूर युनियन (भा. क. प.)
   ३१४, राजभुवन, सरदार पटेल रोड. मुंबई ४०० ००४.

६. गरीब डोंगरी संघटना, ८८४, राईकर बंगला, डे. जिमखाना, पुणे ४.

७. कष्टकरी संघटना, शिसणे, पो. धुंदलवाडी, ता. डहाणू. जि. ठाणे.

८. म. रा. शेतमजूर युनियन (मा. क. प.)
   मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी, जनशक्ती, वरळी, मुंबई ४०० ०२४.

९. छात्र युवा संघर्ष वाहिनी, क्रांती पॅलेस, म्हसवड, ता. माण, जि. सातारा.

१०. म. रा. शेतमजूर युनियन, (लाल बावटा)
    १०७६, गवंडी गल्ली, पंढरपुर, जि. सोलापूर.

११. युवक क्रांती दल, वैजापूर, जि. औरंगाबाद ४२३७०१.

१२. जागृत कामकरी संघटना, "श्रमालय", जिन्ती, ता. फलटण, जि. सातारा

१३. श्रमजीवी संघटना, दहिसर, ता. वसई, जि. ठाणे ४०१ ३०३.

१४. रचनात्मक संघर्ष समिती, गंगाखेड, जि. परभणी ४३१ ५१४.

१५. म. रा. शेतमजूर संघटना (युक्रांद), 'सावली' आनंदनगर, लातूर ४१३५१२

१६. इंडियन फेडरेशन ऑफ बिल्डींग अँड वुड वर्कस्,
    ४ था मजला, डिमेलो भवन, पी. डिमेलोरोड कर्नाक बंदर मुंबई ४०००३८

१७. सत्यशोधक शेतमजूर सभा, फत्तेपूर, ता. शहादे, जि. धुळे.

१८. सत्यशोधक कर्मचारी संघटना (वर्ग ४) येवले, जि. नाशिक.

१९ शोषित शेतकरी कष्टकरी कामगार, मुक्ती संघर्ष,
   द्वारा–क्रांतीसिंह, भैरवनाथ विद्यार्थी वसतीगृह, विटे, जि. सांगली.